जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६१ वे)  किंमत १ रुपया  (अंक १०

जानेवारी १९८३



: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३२६१



वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

रथन्यावया इष्टस्थानीं ।
सारथी जैसा मूळकारणी ।
तैसी ही बुद्धि हितकारिणी ।
दक्ष आकर्षणीं इंद्रियांच्या ॥१७५॥

सारथी करी रथनियमन ।
बुद्धि ही करूनि इंद्रियदमन ।
आवरी शरीर स्वैरगमन ।
अनिवार चंचल पण मनाचें॥१७६॥

शरीर इंद्रिय मनोयुक्त ।
ऐसिया जीवाचें जें भोक्तृत्व ।
तें संपताच वैष्णवपद प्राप्त ।
ऐसें हें सामर्थ्य बुद्धीचें ॥१७७॥

चक्षुरादी इंद्रिय निचय ।
भिन्नभिन्न हयस्थानीय ।
रूपरसादी जे जे विषय ।
मार्ग ते निरय प्रवर्तक ॥१७८॥

यत् किंचित विषया भिलाप ।
करी पारमार्थिक सुखनाश ।
म्हणोनि त्यागा तो निःशेष ।
तरीच तो मोक्ष तुजलाधे ॥१७९॥

— श्रीसाई सच्चरित अध्याय ४९ वा.

## नूतन वर्षाभिनंदन

ख्रिस्ती शताब्दा प्रमाणे सुरू होणारे नूतन वर्ष आमच्या सर्व वाचकांना लेखक–कवींना जाहिरातदारांना हितचिंतकांना सुखाचे व भरभराटीचे जावो– . . .

—संपादक


# अनुक्रमणिका जानेवारी १९८३


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | – शिर्डीचे महात्मा–श्रीसाईबाबा |
| २) | श्रीसाईसच्चरित पठणाचे महत्व | – ले. क. मु. ब. निंबाळकर |
| ३) | सर्व धर्म समभाव म्हणजेच श्रीसाई | – श्री. रविकांत कांबळे |
| ४) | घेतला साई प्रसाद | – ,, मधुकरराव अंबादे |
| ५) | माझे साईबाबा | – सौ. प्रेमला मैराळ |
| ६) | प्रत्यक्ष भेटलेले साईबाबा | – श्री. सुरेश सातपुते |
| ७) | माझे प्राणदाते | – सौ. सरिता पतंगे |
| ८) | श्रीशंकराचे जाग्रत स्थान | – श्री. गौरूराम उरणकर |
| ९) | अन्नपूर्णा साई | – श्री स्वामी संजयानंद |
| १०) | जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती | – कु. हेमलता केसकर |
| ११) | त्यांनी गुरु असा केला | – — |
| १२) | तीळ आणि मानव | – — |
| १३) | नववर्षाचे स्वागत | – चंद्रकांत श्री. गरगटे |
| १४) | सकल ज्ञानाचे साईबाबा | – शांताराम श्रीद |
| १५) | साईमहिमा | – श्री. मुरलीधर घोलप |
| १६) | साई पादानंदस्वामी अमर झाले | – सौ. तारा चेंदवणकर |
| १७) | शिर्डी महिमा | – श्री. प्र. अ. पुराणिक |
| १८) | साईबाबा साईबाबा | – श्री. बबन डी. येरम |
| १९) | पूजितो साईची मूर्ती | – श्री. सूर्यकांत र. दळवी |
| २०) | हरी ॐ साईराम | – श्री. राम धनावडे |
| २१) | साईधाम मुक्तीधाम | – श्री. विनायक पाठक |
| २२) | चमत्कार | – श्री. विठ्ठल याळगी |
| २३) | अब तेरे सिवा कौन | – सौ. चंद्राबेन भाटे |
| २४) | साई माझी गुरुदेवता | – सौ. शीला चवंडे |
| २५) | शिरडी वृत्त–ऑक्टोबर-नोव्हेंबर १९८२ | – |


## साईनिकेतन दादरचा नवा दूरध्वनी क्रमांक

## ८८ २२ ५६ १

# शिरडीचे महात्मा — श्रीसाईबाबा




● शिरडीचा महात्मा सद्गुरू साईबाबा हे या विसाव्या शतकातच होऊन गेले. श्री साईबाबा हे आत्मसाक्षात्कार झालेले आत्मनिष्ठ असे गूढवादी होते. त्यांनी कोणत्याही नवीन धर्माची किंवा पंथाची स्थापना केली नाही असे असले तरी त्यांचे स्थान अजोड आहे. त्यांचे कार्य साध्यासुध्या डोळ्यांना दिसणारे नाही. त्यांच्या काळातील किंवा आजच्या काळातील लोकांना ज्या गोष्टीचे आकलन झाले नाही ते त्यांनी केले. बाबांचे कार्य ज्याला मनापासून समजून घ्यायची इच्छा आहे त्याने 'श्रीसाईसच्चरित' ग्रंथाची असंख्य पारायणावर पारायणे करून ती पचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे तेव्हा कुठे बाबांच्या कार्याविषयी थोड्या फार प्रमाणात कळून येईल.

'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले
तोची साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा'

या संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे रंजल्या गांजलेल्यांना ते आपलेपणा दाखवीत, त्यांची दुःखे दूर करीत, त्यांची सेवा करीत तसेच जातीभेदाला समूळ नष्ट व्हावा, सर्वांनी समान पातळीवर यावे, अहिंसा धर्माचे पालन करावे, सत्याचरण करावे. जरूरीपेक्षा अधिक द्रव्याचा हव्यास न धरता स्वतःच्या गरजा भागवून जे उरेल त्यांचा विनियोग परोपकारार्थ करावा अशी कितीतरी बहुमोल तत्वे त्यांनी सांगितली ती सुद्धा स्वतःच्या आचरणातून.

आपणास झालेले ज्ञान सर्व लोकांना देऊन त्यांना सुखी करण्यासाठी झटावयाचे हीच त्यांची आकांक्षा होती. चंदनाचा सुगंध ज्याप्रमाणे दडून रहात नाही त्याप्रमाणे ते जेथे जेथे गेले अथवा जे जे त्यांच्या संपर्कात आले तेथे तेथे त्यांचा त्यांच्यावर त्यांनी आपल्या गुणांचा पर्यायाने कार्याचा प्रभाव पाडला म्हणूनच सर्व स्तरातील भक्त बाबांना मिळाले. त्यांचे भक्त या नात्याने आपले कर्तव्य कोणते ? हे पाहणे व ठरविणे फारसे कठीण नाही. श्रीसाईबाबांची तत्वे आपण बरोबर समजून घेतली पाहिजेत. ती तंतोतंत आचरणात आणण्यासाठी झटले पाहिजे कारण श्रीसाईबाबांचा अवतार मानव जातीच्या कल्याणासाठी होता या सत्याचा स्वीकार आपण केल्यानंतर त्यांच्या कार्यांचा व तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार जास्तीत जास्त करावयास पाहिजे.

साईबाबांनी गरीब श्रीमंत यांना जवळ केले. कुणी मोठा नाही, कुणी छोटा नाही. आपण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत त्यामुळे जाती जातीत, धर्माधर्मात वैर असता कामा नये, सर्वांत समभाव निर्माण झाला पाहीजे ही मानवतेची शिकवण देताना बाबा म्हणत.

" जाती जमातीत भांडणं व्हत्यात, डोस्कीबी फुटत्यात पण भांडणं कशापायी व्हत्यात, डोस्की कशापायी फुटत्यात ? शेतावरनं, घरादारावरनं भाऊभाऊत भांडणं व्हत्यात, पण ते भांडणं कशानं लागतात ह्याचा बी इचार करायला हवा तुझं ताट वेगळं, माझं ताट वेगळं, तुझी चूल वेगळी, माझी चूल वेगळी, तुझं अंगण वेगळं, माझं अंगण वेगळं यापाठी भाऊभावात पडलेली ही रेघ पुसून काढली पाहीजे. वाढल्यास दोन घरे राहू द्यात पण गावाची चूल मात्र एक हवी जी ओली सुकी चतकूर भाकरी ताटास असेल ती समद्यांच्या येऊन खाली तर भांडणं नाही व्हायची बाबांनो ज्या गावात भाऊबंदकीने बीळ केलं आहे. ज्या देशात दोन जमातीत तेढ आहे तो गाव तो देश गपकन् भुईत गडप व्हईल येड्यांनो ! "

समतेची अशी महान शिकवण मानवतेची सेवा अर्थात रंजल्या गांजलेल्यांची सेवा करता करता साईबाबा आपणास देऊन गेले. बाबांची ही शिकवण त्यांच्या भक्तांना घराघरातून पोहचविली पाहिजे कारण ती सर्वांस कल्याणकारक आहे.

प्रयत्न करीत रहावे, प्रयत्न म्हणजेच परमेश्वर हे सुद्धा बाबांनी आपल्या भक्तांना सांगितले. प्रयत्नमग्न असणे म्हणजे कार्यरत असणे हा आत्मोन्नतीचा मार्ग होय. ऐहिक उन्नती व्यक्तींनी करून घेणे हे काही पाप नाही. तू तुझे काम उत्कृष्टपणे कर मग ते वैयक्तिक असो, सामाजिक असो की, राजकीय असो,' काम सतत काम, अविश्रांत श्रम कर. असे वागणाऱ्यांच्या घर्मबिंदूत परमेश्वर साठविलेला असतो.

श्रीसाईबाबांनी हयातभर समता, विश्वबंधुत्व, भूतदया व परमेश्वरावर श्रद्धा भक्ती आदि संस्कृतीला पोषक असलेल्या मानवतावादी गोष्टींचा हिरीरीने प्रसार केला आणि स्वतःच्या कृतीने भक्तांना दाखवून दिले की, ह्या गोष्टी आचरण्यातच त्यांच्या जीवनाचे सार्थक आहे.

साईबाबांच्या कार्याविषयी किती सांगावे किती लिहावे साईबा संपतच नाही.

शिर्डीचे महात्मा साईबाबा हे जग सोडून गे

अमर कार्य आजही जगावर प्रभाव पाडीत आहे, हे निश्चित समजावे म्हणून आपण साईबाबांवर श्रद्धा ठेऊन अनन्यभावे शरण जाऊ या.

" दुःख संकटे आलीत जरी
करू नका कधीच फिकीर....
ठेवा अंतरी श्रद्धा सबुरी
आपोआप निवारील शिरडीचा फकीर! "


श्रीसाईलीला

## फेब्रुवारी १९८३ चा खास अंक

### श्रीसाई काव्यबहार विशेषांक

श्री साईबाबांच्या विषयी अनेक कवितांनी, भरगच्च थोरा मोठ्या भक्तांनी श्रीबाबांना वाहिलेली भाव काव्य सुमनांजली

पृष्ठे ६४ ] [ किंमत १ रुपया

श्री साईलीला ९ व्या लेखक–कवी संमेलनप्रसंगी शिर्डीस प्रकाशित होणार. अंकाची संपूर्ण तयारी झालेली असल्याने कुणाही कवी भक्ताने आता या अंकासाठी कविता पाठवू नयेत.

# श्रीसाईसच्चरित पठणाचे माहात्म्य व फलश्रुती याबद्दल निवडक ५३ ओव्या

—प्रेषक–ले. कर्नल **मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्
बंड गार्डन रोड, पुणे–४११००१

## श्रीसाईसच्चरिता बद्दल

**खुद्द बाबा** म्हणतात—

करिता माझिया कथांचे श्रवण । तयाचे कीर्तन आणि चिंतन ।
होईल मद्भक्तींचे जनन । अविद्या निरसन रोकडे ॥ अ. २ ओ. ८२ ॥

**मग जो गाई वाडेंकोडें । माझें चरित्र, माझे पवाडे ।**
**तयाचिया मी मागें पुढें । चोहींकडे उभाचि** ॥ अ. ३ ओ. १२ ॥

कोणीही केल्या माझे कीर्तन । तयासी देईन आनंद घन ।
नित्य सौख्य समाधान । सत्य वचन मानावे ॥ १४ ॥

कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून ।
करिता केवळ मत्कथा श्रवण । रोगनिरसन होईल ॥ १७ ॥

कथा करा सादर श्रवण । त्यावरी करा पूर्ण मनन ।
मननावरी निदीध्यासन । समाधान पावाल ॥ १८ ॥

× × ×

**हेमाडपंत** म्हणतात —

ब्राह्मणादी चारी वर्ण । सर्वांसी साधन गुरुकथा श्रवण ।
असो स्त्री शुद्र वा जातिहीन । हे एक साधन सकळांते ॥ अ. २ ओ. ५४ ॥

योग याग ध्यान धारणा । करू जातां प्रयास नाना ।
आयास नलगे या कथा श्रवणा । एक अवधानावांचून ॥ ५७ ॥

ऐसी ही साईची कथा निर्मळ । परिसोत सज्जन श्रोते प्रेमळ ।
जळतील पंचमहापापे प्रबळ । जातील समूळ विलयाला ॥ ५८ ॥

असतां जरी गर्क संसारी । पडली संतकथा कानावरी ।
यत्न न करिता तिळभरी । कल्याणकारी ती स्वभावे ॥ १५२ ॥

मग ती भक्तिभावे परिसतां । केवढे श्रेय चढेल हाता ।
श्रोता विचार करावा चित्ता । आपुल्या निजहिता कारणे ॥ १५३ ॥

नलगे व्रत उद्यापन । नलगे उपवास शरीरशोषण ।
नलगे तीर्थयात्रा पर्यटण । चरित्रश्रवण एक पुरे ॥ १८२ ॥

आणिक या कथांचे इंगीत । भूती सदैव पहावा भगवंत ।
हेचि सकलशास्त्रसंमत । हाचि सिद्धांत येथील ॥ अ. ९ ओ. १५८ ॥

होऊनि श्रद्धा-भक्तियुक्त । करील जो या अध्यायाचें नित्य ।
पारायण होऊनि स्वस्थचित्त । आपदानिर्मुक्त होईल ॥ अ. ११ ओ. १५० ॥

पुरेल अपूर्व इच्छित काम । व्हाल अंती पूर्ण निष्काम ।
पावाल दुर्लभ सायुज्यधाम । अखंड राम लाधाल ॥ १५२ ॥

पुण्यपावन हें चरित्र। जल जैसे गंगेचें पवित्र ।
धन्य श्रवणकर्त्यांचे श्रोत्र । इहपरत्रसाधक तें ॥ अ. १२ ओ. २१ ॥

पाहूं अमृताची उपमा देऊन । परीं अमृत काय गोड याहून ।
अमृत करील प्राणरक्षण । जन्मनिवारण चरित्र हे ॥ २२ ॥

नित्य पडतां या कथा श्रवणीं । साई दिसेल नित्य नयनीं ।
मनीं ध्यानीं दिवारजनीं । स्मरणी चिंतनीं राहील ॥ अ. १४ ओ. ३२ ॥

दिसू लागेल जागृतिस्वप्नी । शयनी आणि भोजनी ।
सवेंही येईल गमनागमनीं । जनी वनी निरंतर ॥ ३३ ॥

ऐसे येता निदिध्यासनी । मन पावेल स्थिती उन्मनी ।
ऐसे होऊं लागतां अनुदिनी । चित्त चैतन्यी समरसेल ॥ ३४ ॥

चरित्र नव्हे हा सुखाचा ठेवा । निज परमामृताचा मेवा ।
मार्गे आगळा तेणेचि सेवावा । भक्तिभावाकरोनी ॥ २१५ ॥

सबूरी आणि श्रद्धायुक्त । सादर सेविता हे कथामृत ।
ओंतुडेल भक्ति प्रेमयुक्त । श्रोते कृतकृत्य होतील ॥ अ. १५ ओ. ८॥

जैसा उगवता दिनमणि । अंधार जाय निरसोनी ।
तैसी या कथापीयूषपानी । माया हरपोनी जातसे ॥ अ. २० ओ. १३४ ॥

ग्रंथ करावा आधी श्रवण । त्याचेच मग करावे मनन ।
होता पारायणावर्तन । निदिध्यासन होतसे ॥ अ. २१ ओ. ७१ ॥

वाचिलें तें नाही संपलें । पाहिजे ते कृतीत उतरलें ।
या उपड्या घड्यावर तोय ओतले । तैसे जाहले ते सकळ ॥ ७२ ॥

**हा सच्चरित मार्ग धोपट । जेथे जेथे याचा पाठ ।**
**तेथेच द्वारकामाईचा मठ । साईही प्रकट निश्चये** ॥ अ. ३५ ओ. २१८ ॥

**तेथेच गोदावरीचे तट । तेथेच शिरडी क्षेत्र निकट ।**
**तेथेच साई धुनीसकट । स्मरता संकट निवारी** ॥ २१९ ॥

**जेथे साईचरित पठण । तेथे सदैव साईनिवसन ।**
**श्रद्धापूर्वक चरित्रावर्तन । करिता तो प्रसन्न सर्वभावें** ॥ २२० ॥

**दिवसाच्या कोणत्याही प्रहरी । वाचील नित्य हें चरित्र जरी ।**
**निजगुरुराजसह श्रीहरी । भेटेल निर्धारी भाविकां** ॥ अ. ३७ ओ. ९६ ॥

**अखंड लक्ष्मी नांदेल घरीं । वाचितील जे निरंतरीं ।**
**निदान जो एक सप्ताह करी । दरिद्र दूरी तयाचें** ॥ ९७ ॥

करूनिया एकाग्र मन । अभिवंदूनी साईचरण ।
महामंगल परम पावन । करी जो श्रवण या कथा ॥ अ. ४५ ओ. १३ ॥

जो भक्त भक्तिसमन्वित । निजस्वार्थ साधावया उद्यत ।
होऊनिया एकाग्रचित्त । कथामृत हे सेवील ॥ १४ ॥

साई पुरवील तयाचे अर्थ । पुरवील स्वार्थ आणि परमार्थ ।
सेवा कधींही जाई न व्यर्थ । अंती तो कृतार्थ करील ॥ १५ ॥

श्रवण करिता साईसच्चरित । श्रोते वक्ते नित्यपूत ।
पापपुण्याचा होई घात । नित्यमुक्त दोघेही ॥ अ. ४८ ओ. ३२ ॥

भाग्यें आगळे ऐकतां श्रोत्र । भाग्यें आगळे वक्त्याचे वक्त्र ।
धन्य हे श्रीसाईस्तोत्र । अतिपवित्र निजभक्तां ॥ ३३ ॥

तुटावया संसारबंधन । याहूनि नाहीं अन्य साधन ।
साईकथा परम पावन । सदा सेवन सुखदायी ॥ अ. ४९ ओ. २५ ॥

**असो आतां येणें मना । धरूनियां बाबांच्या चरणां ।**
**करावी तयांस एक प्रार्थना । सकल भक्तजनांकारणे ॥ अ. ५२ ओ. ४२ ॥**

**कीं हा ग्रंथ सर्वां घरीं । असावा नित्य पाठांतरीं ।**
**नियमें प्रेमे पारायण करी । संकटें वारी तयांचे ॥ ४३ ॥**

**होवोनियां शुचिर्भूत । प्रेम आणि श्रद्धायुक्त ।**
**वाचील जो हा सात दिसांत । अनिष्ट शांत तयाचीं ॥ ४५ ॥**

करितां हे सच्चरित श्रवण । अथवा नेमें पारायण ।
करितील साई समर्थचरण । संकट निवारण अविलंबे ॥ ४७ ॥

धनेच्छूसी लाभेल धन । शुद्ध व्यवहारी यश पूर्ण ।
फळ येईल निष्ठेसमान । येईना भावावीण अनुभव ॥ ४८ ॥

आदरें करितां ग्रंथवाचन । साईसमर्थ सुप्रसन्न ।
करी अज्ञानदारिद्र्य विच्छिन्न । ज्ञान धन संपन्नता ॥ ४९ ॥

**चित्त करूनिया सुसमाहित । नेमनिष्ठ हें सच्चरित ।**
**वाचावा एक तरी अध्याय नित । होईल अमित सुखदायी ॥ ५१ ॥**

जया मनीं स्वहितविचार । तेणें हा ग्रंथ वाचावा साचार ।
जन्मोजन्मीं साईंचे उपकार । आनंद निर्भर आठवील ॥ ५२ ॥

गुरुपौर्णिमा गोकुळ अष्टमी । पुण्यतिथी रामनवमी ।
या साईंच्या उत्सवीं नियमीं । ग्रंथ निजधामीं वाचावा ॥ ५३ ॥

ऐसा ग्रंथ अध्ययितां संपूर्ण । मनः कामना होतील पूर्ण ।
हृदयीं धरिल्या सद्गुरुचरण । होईल उत्तीर्ण भवसागर ॥ ८३ ॥

रोगिया होय आरोग्य । दरिद्री होय धनाढ्य ।
संकल्प-विकल्पा येई स्थैर्य । दीना औदार्य लाभेल ॥ ८४ ॥

पिशाच्च-बाधा अपस्मार । ग्रंथावर्तने होतील दूर ।
मूक अपंग पंगू बधिर । तयांही सुखकर हे श्रवण ॥ ८५ ॥

जो शक्तिमान परमेश्वर । तयाचा जयासी पडला विसर ।
ऐसे जे अविद्यामोहित नर । होईल उद्धार तयांचा ॥ ८६ ॥

नर असूनि असुराचार[1] । करूनी मिथ्या दवडिती शरीरा ।
संसार मानिती सुखाचे आगर । होईल उद्धार तयांचा ॥ ८७ ॥

**बाबांचे बाळ** ( अवतरणिका ) म्हणतात

**ग्रंथ नव्हे हा कल्पवृक्ष । संसारजनां वाटे रुक्ष ।**
**मुमुक्षभाविकां केवळ मोक्ष । अनुभव प्रत्यक्ष पहावा** ॥अ. ५२ ओ. १७१॥

चोखट करूनि अंतःकरण । भक्तिभावे करावे पारायण ।
एक, द्वि, वा त्र्यहनीं[2] करावें पूर्ण । साईनारायण तोषेल ॥ १८२ ॥

अथवा करावा सप्ताह गोड । मिळेल पुण्यसंपत्तीची जोड ।
साई पुरवील मनींचे कोड । भवभय मोड होईल ॥ १८३ ॥

देणें तोषेल साईभगवान । देईल भक्ता पसायदान[3] ।
छेदील भवभय-लेखिंहान[4] । दावील निधान मोक्षाचे ॥ १९५ ॥

---

१. राक्षसांसारखे वागणे २. तीन दिवसांत ३. प्रसाद ४. साप

# सर्वधर्म समभाव ! राष्ट्रीय एकात्मता म्हणजेच श्री भगवान साईबाबा !

—श्री. रविकांत निळकंठ कांबळे
६५१/२, बुधवार पेठ,
जोगेश्वरी मंदिरासमोर बोळात
पुणे ४११००२

● श्री सदगुरू साईनाथबाबा हे अवतारी पुरुष, योगी होऊन गेले. ते दत्त अवतारच होते. ते कोठून, कसे काय आले ! त्यांनी कुठे, कसा काय जन्म घेतला ? हे एक गूढ आहे व ते गूढ कुणालाही उलगडणार नाही. साईबाबा हे कोण, कसे काय का, कशाकरिता या पृथ्वीतलावर मानवदेह धारण करून जन्माला आले ! याचे उत्तर मानवी बुद्धीच्या पलिकडील होय ! परमेश्वर या भूतलावर मानवरूप घेऊन अवतरतात, व प्रगट होतात. धर्म, कार्य, प्रसार करण्याकरिता हे अवतार घेत असतात. जिथे धर्म आहे तिथे विजय हा ठेवलेलाच ! योगेश्वर श्रीकृष्णांनी गीतेमध्ये मानवांना असा दिव्य संदेश दिलेला आहे की' धर्मावर जेव्हा जेव्हा संकट येईल तेव्हा मी त्याच्या रक्षणासाठी या पृथ्वीवर मी अवतार घेईन.

श्रीसाईबाबा हे धर्म कार्याकरिता प्रथम शिर्डीच्या बाहेर खंडोबाचे देवळाजवळ आले. त्यांना पाहून खंडोबाचे पुजारी म्हाळसापतींनी त्यांना यावे साईबाबा या नावाने हाक मारली. तेव्हापासून त्यांना 'साई' या नावाने ओळखू लागले. खंडोबाचे दर्शन घेऊन त्यांनी शिर्डीची सीमा ओलांडली. रंगभूमीवरील एखादा कुशल, कसलेला नट ज्याप्रमाणे विंगमधून रंगभूमीवर प्रवेश करतो. त्याचप्रमाणे साईंनी शिरडी गावात प्रवेश केला. साईंच्या पवित्र, पावन चरणांनी साईनगरी पवित्र झाली. साईंच्या आगमनाने शिरडीचे भाग्य उजळले. साईंच्या मंगल पावन वास्तव्याने शिर्डी नगरी दुमदुमली नि गजबजून गेली. तिला तीर्थक्षेत्राचे स्वरूप आले. त्यांच्यामुळेच त्या नगरीला महत्व प्राप्त झाले. साईंच्या रूपानेच प्रत्यक्ष परमेश्वर प्रगट झाले. त्यांनी चमत्कार करून लोकांना चकित करून सोडल्यामुळेच लोक त्यांना ईश्वर, देव मानू लागले. लोकांची त्यांच्यावर श्रद्धा बसली. लोक त्यांना पूज्य मानू लागले, त्यांच्याबद्दल

लोकांना आदर वाटू लागला. पुष्कळजण त्यांचे भक्त बनले. पतीच्या शापाने शिळा बनलेली अहिल्या प्रभू रामचंद्राच्या पद स्पर्शाने सजीव झाली. पूर्ववत सुंदर स्त्री देह तिला प्राप्त झाला. तिचा उद्धार झाला. तद्वतच साईच्या पवित्र पदस्पर्शाने शिर्डीची भूमी पावन झाली. एका लहान नगरीला पवित्र स्थानाचे स्वरूप आले. त्याचे सोने झाले. साईच्या दर्शनासाठी शिर्डीत भक्तांची अलोट गर्दी होऊ लागली.

शिर्डी आज धार्मिक, पवित्र, जागृत तीर्थक्षेत्र बनले आहे. साईंचा आज तिथे वास असल्यामुळे ते आज तीर्थस्थान बनले आहे. साईंची आत्मज्योत देहातून बाहेर गेली तरी ती आजही अग्नी नारायणाच्या स्वरुपात धुनीच्या रूपाने ती दिव्य ज्योत अखंड तेजाने तळपत आहे. साईबाबांच्या अस्तित्वाची ती आज साक्ष देत आहे. त्या धुनीच्या रूपानेच साईबाबा आज शिर्डीत वास करीत आहेत. श्रीसाईंनी अवतार कार्य संपविल्यानंतरही शिर्डीला आज अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. कारण की, श्री साई बाबा हे साक्षात परमेश्वर अवतारच होते. शिर्डीत ते एका मशिदीत रहात असत. त्या मशिदीलाच त्यांनी 'द्वारकामाई' असे नाव दिले. त्यांच्या दर्शनासाठी द्वारका-माईत सर्व धर्मांच्या लोकांची गर्दी उसळत असे. त्यात काही त्यांच्या सान्निध्यात असलेले भक्तगणही असत. साईबाबा सर्वांना धर्म पालनाची शिकवण देत असत. प्रत्येकाने आपल्या धर्माप्रमाणे वागावे. धर्मावर श्रद्धा, भाव ठेवावा. धर्माचा आदर करावा. प्रेम करावे. आपले आचरण शुद्ध ठेवावे. धर्माची शिकवण आचरणात आणावी. कुणीही कुणाच्या धर्मात ढवळाढवळ, हस्तक्षेप करू नये. प्रत्येकाचे मन निर्मळ, स्वच्छ असावे. तरच धर्म टिकेल. सर्व धर्माचे लोक, साईंना पूज्य, देवासमान मानीत. त्यातूनच सर्वांना 'सर्व धर्म समभाव' यांची शिकवण, प्रेरणा मिळाली. सर्व धर्मैक्याच्या एकात्मतेच राष्ट्रीय एकात्मताचे ध्येय साध्य करता येते. पण धर्म पाल-नाचे तत्व बाजूला ठेवायचे व राष्ट्रीय ऐक्याच्या गप्पा मारायच्या हे धोरण घातक आहे. ते देशाच्या ऐक्याला व राष्ट्रीय एकात्मतेला बाधक आहे. नुसत्या घोषणा नि जाहिरात करून, भाषणे करून राष्ट्रीय एकात्मता व सर्व धर्म सम भाव' ह्या पवित्र कृती साध्य होणार नाहीत. त्याला प्रत्यक्ष कृतीचीच जरूरी आहे. साईबाबांनी त्या कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला. लोकांत तशी जागृती केली. पण ढोंगी, लबाड, स्वार्थी पुढाऱ्यांनी, राज्यकर्त्यांनी मात्र देशाचे फार मोठे नुकसान केले. स्वार्थी, दुष्ट हेतूनेच त्यांनी या घोषणा केल्या. तसेच खुर्चीची सत्ता व सत्तेचे राजकारण करीत ते जनतेची शुद्ध फसवणूक करीत आहेत.

श्री साईंना शिर्डीश्वर किंवा शिरडीश्वर म्हटले, तर काही फारसे वावगे होणार नाही. शिर्डी या शब्दाचा अपभ्रंश होऊनच पुढे त्यांचे शिरडी असे नाव पडले.

द्वारकामाईलाच लागूनच पुढे साईबाबांची चावडी आहे. साईबाबा कधी कधी त्या चावडीत बसत. कुणाच्या काही अडीअडचणी असतील त्या सोडविण्याचे काम ते करीत 'पंढरी, पंढरी। विठूरायाची नगरी'। त्याप्रमाणेच 'शिरडी, शिरडी,। साईबाबाची नगरी' असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती नाही. साईच्या वास्तव्यामुळे शिरडीत वैकुंठ आले. वैकुंठ नि कैलास ही स्वर्गातील दोन निवास स्थाने पृथ्वीवर प्रगट झाली. असा भास झाला. 'चला जाऊ शिरडीला। साईनाथांच्या दर्शनाला'। 'सर्व धर्म समभाव'। 'मनी धरा राष्ट्र एकयाचा दृढभाव'। 'साई सर्वांची शक्ति प्रेरक। साई राष्ट्रीय ऐक्याचे हो प्रतिक'। 'श्रद्धा सबुरीचा दिव्य संदेश'। देऊनी हा सर्वा मंत्र करिती उपदेश'। देति सर्व जना दिव्य आदेश,। 'सबका मालिक एक'। धर्म, पंथ, जाती अनेक'। 'साई सर्व धर्मियांचे देव'। 'श्रीठेवी भाव, घेई हृदयाचा ठाव'। ही जनकल्याणाची ठेव'। जनहिताची ठेव। 'अल्ला तेरा भला करेगा'। अल्ला सबका भला करेगा। 'ईश्वर सबका भला करेगा'। 'तुम्ही सर्व माझ्याकडे श्रद्धा भक्ति भावाने पहा,' मी तुमच्याकडे कृपा दृष्टीने पाहिन.'। पंढरपुरात भगवंताने जनाच्या उद्धारा करिता पांडूरंग विठ्ठल या नावाने अवतार घेतला. प्रसार करण्याकरिता भगवंताने या भूमीवर संताना पाटविले. शिर्डीत साईबाबा अवतरले. शिर्डीत साईबाबा पांडूरंगाच्या रूपाने प्रगटले.

साईबाबा आज जर शिर्डीत साक्षात् असते तर—द्वारकामाईत त्यांचे वास्तव्य असते तर, त्यांना भेटण्यासाठी, त्यांच्याबरोबर बोलण्यासाठी त्यांच्या दर्शनासाठी अनेक भक्तांची तिथे अलोटगर्दी जमली असती. आज जरी त्यांनी समाधी घेतली असली तरी त्यांच्या समाधी दर्शनासाठी, आरतीसाठी, अभिषेकासाठी अखंड गर्दी लोटत असते. राजकारणी पुरुषांना, पुढाऱ्यांना (व्यक्तिंना) राज कारणी धुरीणांना, राज्यकर्त्यांना, राजकीय धुरंधरांना जे कार्य जमले नाही. ते सर्व धर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मतेचे कर्मकठिण कार्य साईबाबांनी आपल्या अवतार कार्यात करून दाखविले, साईनी ते कार्य प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखविले. खऱ्या अर्थाने साईबाबा त्या तत्वाचे खरे प्रेरक आहेत. त्यांनीच या पवित्र कार्याला प्रेरणा दिली, आजच्या राजकीय निधर्मी पुढाऱ्यांना, राज्यकर्त्यांना, स्वार्थी, भोंदू, सत्तापिपासू, सत्ताधाऱ्यांना त्याचे श्रेय नाही. सत्तेचे राजकारण करणाऱ्या, लोकशाहीच्या नावावर स्वताचा स्वार्थ साधू पहाणाऱ्या सत्ताअभिलाषी राज्यकर्त्यांना त्याचे श्रेय नाही.

अवतारी पुरुष हे जगामध्ये लोकांच्या उद्धाराकरिता, कल्याणाकरिता जन्माला येतात, प्रगट होतात. ते मानवतेची शिकवण देतात, तसेच ते प्रत्येकाला धर्म पालनांची, कर्तव्य, धर्म पालनाची ते शिकवण देतात. त्यांच्या करिताच त्यांचा अवतार

असतो. परमेश्वर सर्वज्ञानी, सर्वसाक्षी, अंतर्ज्ञानी आहे. साईनाथ हे कुठल्याही धर्माचा द्वेष करीत नसत परधर्मीयाबद्दल त्यांच्या मनात दुजाभाव, आकस नव्हता. सर्व धर्मांना ते समान मानित असत। सर्व धर्मियांना ते समानतेची वागणूक देत असत. सर्व धर्माचे लोक त्यांच्या दर्शनासाठी द्वारकामाईत येत. तिथे धर्म, पंथ, जातीभेद नव्हता कुठल्याहि राजकीय पक्षांना ते कार्य जमले नाही. करता आले नाही. ते साईनी आपल्या अवतारात सहज लिलेने करून दाखविले. हेच त्यांच्या अवताराचे प्रमुख कार्य आहे.

धर्म हा सर्वश्रेष्ठ आहे. प्रत्येक मानवाने धर्म कार्य करीत राहिले पाहिजे, आपला राष्ट्रधर्म पाळलाच पाहिजे. प्रत्येकाने आपल्या धर्मावर प्राणापेक्षाही प्रेम केले पाहिजे. प्रत्येकाने धर्मावर निष्ठा ठेवली पाहिजे. शरीरात प्राण ( आत्मा ) असेल तरच त्याला मोल आहे. आत्म्यावाचून देहाला मोल नाही देहात आत्मा असेल तर त्यात चैतन्य असते. त्यातून आत्मा निघून गेला तर तो देह निर्जिव बनतो.

धर्मामुळेच राष्ट्राला चैतन्य येते. धर्म नसेल तर राष्ट्राची किंमत मातीमोल होईल. धर्म हा राष्ट्राचा जीव की प्राण आहे. तो नसेल तर राष्ट्र हे धुळीला मिळेल. धर्माच्या पाया शुद्ध नि निर्मळ असेल तरच राष्ट्राच्या लोकशाहीची भव्य इमारत त्या भक्कम मजबूत पायावर उभारली जाईल. अन्यथा त्याचा पाया डळमळीत असेल तर ती इमारत कोसळेल, कोलमडून पडेल. धर्माच्या शिकवणीमुळेच राष्ट्र–नीतीमान, सुसंस्कृत बनेल. त्याला चांगले संस्कार प्राप्त होऊन, त्यातूनच नीतीमान, सुसंस्कृत समाज निर्माण होईल. प्रत्येकाने धर्माचरण शुद्ध ठेवले पाहिजे. दुसऱ्यांच्या धर्माबद्दल आदर, पूज्यभाव बाळगला पाहिजे. प्रत्येकाने आपले आचरण शुद्ध ठेवले पाहिजे. मन स्वच्छ नि निर्मळ असले पाहिजे. प्रत्येकाला आपला धर्म प्रिय असणारच ! साईंनी कुणालाही आपला धर्म सोडा म्हणून सांगितले नाही. धर्म भिन्न असले तरी या जगात परमेश्वर एकच आहे. म्हणूनच साईबाबा नेहमी, ‘ सबका मालिक एक ’ असे सांगत असत! प्रत्येक धर्माच्या शिकवणीत थोडा फार फरक असेल, तत्वे वेगळी असतील, परंतु मनुष्यप्राणी हा इथून तिथून एकच आहे. प्रत्येकाने एकमेकांकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. साईनाथ हे सर्व धर्मांच्या ऐक्याचे प्रतिक होते. सर्व धर्मांचे मूर्तिमंत स्वरूप साईंच्या रूपात साकारलेले होते, विनटलेले होते. म्हणूनच सर्व धर्मांचे लोक साईंना परमेश्वरासमान मानीत होते. त्यांच्यावर सर्व भक्तांची अढळ श्रद्धा होती. त्यांच्याविषयी सर्वांच्या मनात आदर, पूज्यभाव होता. धर्मावाचून राष्ट्राचे कल्याण होणार नाही. देशाचे हित साधणार नाही. धर्म हा देश, राष्ट्र संघटनेचे साधन आहे. त्याच्याशिवाय राष्ट्र–ऐक्य साध्य होणार नाही. धर्म नि राजकारण

यांची सांगड घातल्याशिवाय राष्ट्राचा उद्धार होणार नाही. राष्ट्राची उज्वल परंपरा, चारित्र्य संपन्न समाज घडविण्यासाठी नि भवितव्याची चांगली घडण घडविण्यासाठी, आणि ही थोर परंपरा टिकविण्यासाठी, राष्ट्राची निर्मल, मंगल जडण, घडण होण्यासाठी, राष्ट्र शक्तिशाली, बलशाली होण्याकरिता धर्माचे राज्य झाले पाहिजे. हिंदु धर्म हा सहिष्णुतेवरच आधारलेला आहे.

अवतारी पुरुष, योगी, जोगी, तपस्वी, थोर साधुसंत, ऋषीमुनी हे धर्म, निष्ठा, त्याग, परोपकार, मानवता, आचार विचार, भक्तिभाव यांचे संस्कार घडविण्यासाठी, मनात, जीवनात त्यांचे प्रतिबिंब उमटविण्यासाठी वेळोवेळी या जगात अवतार घेत असतात. मानवांना चांगल्या संस्काराची जाणीव देतात. त्यातून चांगली सद्गुणी, सद्गुण संपन्न, ज्ञानी, विद्वान पुरुष निर्माण करण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात. स्वधर्मावर प्रेम करीत असताना पर धर्मावर पण आपण प्रेम केले पाहिजे; आदर दाखवला पाहिजे तरच 'सर्व धर्म सम भाव' हे ध्येय तत्व साकार होईल. तसेच ते कृतीत उतरविण्यास मदत होईल. त्यानेच राष्ट्राचे ऐक्य साध्य होईल. 'राष्ट्रीय एकात्मता' साकार होईल.

शिवाजी महाराजांनी धर्माचे राज्य – हिंदवी स्वराज्य, हिंदु पदपातशाही स्थापना केली. त्यानेच राष्ट्रीय ऐक्य साध्य झाले, नि राष्ट्रीय एकात्मतेचे ध्येय साकार झाले. संभाजीराजांनी धर्माकरिता आपल्या प्राणाचे बलिदान केले. म्हणूनच त्यांना 'धर्मवीर संभाजी' म्हणू लागले. साईनी हयातीपर्यंत जनसेवा केली. एखाद्या पुढाऱ्याला, देशभक्ताला नि राज्यकर्त्यांना जे जमले नाही ते अवघड कार्य त्यांनी सहज लीलेने करून दाखविले. त्या साऱ्यांना त्यांनी लाजविले. साईबाबांनी अन्नदान, दान धर्म केला. गोरगरिबांना अन्न शिजवून खाऊ घातले. अन्नदानाचे पुण्य केले. साईबाबांची प्राणज्योत ब्रह्मांडात, पंचत्वात विलीन पावली (झाली). ती दिव्य–ज्योत सर्वसामान्य मानवाना सन्मार्गाचा प्रकाश, उजेड दाखवित राहिल. ते सर्वांना समान मानित, उच्च, नीच असा ते भेद करीत नसत. जाती बादारम ते भार देत नसत. म्हणूनच आजही सर्व भक्तगण त्यांची मनोभावे, भक्तिभावाने सेवा करतात. धर्माची शिकवण देऊन मानवावर सुसंस्कार घडविण्याचे महान कार्य अवतारी पुरुष करीत असतात. त्यातूनच सुसंस्कृत मानव समाज निर्माण होईल, असे ते मानित म्हणूनच या देशाला, राष्ट्राला आज श्रीदत्तात्रेय, श्रीअक्कलकोटस्वामी समर्थ, शिरडीचे साईबाबा, शेगावचे गजानन महाराज, समर्थ रामदास यांच्या सारख्या महान अवतारी पुरुषांची नितांत गरज आहे त्यांच्याशिवाय राष्ट्राचा उद्धार होणार नाही. राष्ट्राचा कारभार सुरळीत चालणार नाही.

☆

# घेतला साईप्रसाद, लाभला आशिर्वाद !

—श्री. मधुकर गजाननराव अंबाडे
' अंबाडे हाऊस ' दांडिया बाजार,
बडोदे १

● श्रीसाईबाबांचे प्रचितीरूप अनुभव आजपर्यंत अनेक आले. त्यातील मला लहान वयात सर्वप्रथम झालेल्या अनुभवामुळे विलक्षण आनंद झाला आणि ह्या एका प्रसंगातून सद्गुरू साईबाबांनी अनेक बोध दिले. जीवनात त्याप्रमाणे चालण्याचा मी प्रयत्न करत असल्यामुळे अर्थात प्रयत्न हा साईबाबांच्या कृपेनेच घडत आहे. आशीर्वादरूप अनुभवाचा प्रसादच दिला जात आहे आणि जीवन आनंदमय केले जात आहे.

साईबाबांचा प्रसाद सर्व साईभक्त भक्तिभावाने खातातच आणि समाधान मानतात. परंतु प्रसाद न खाता मनाला एक विशेष प्रकारच्या आनंदाचा आणि समाधानाचा अनुभव यावा ही एक चमत्कारिक पण सत्य वस्तुस्थिती आहे.

साईबाबांचा प्रत्येक चमत्कार हा ज्ञानामृताने भरलेला एक घट आहे. ह्या अमृत तुल्य तत्वज्ञानाचे घट घरोघरी नेमाने भरून ठेवण्याचे कार्य ' साईलीला ' मासिकाद्वारे होत आहे.

साईबाबांचे आलेले काही अनुभव फार लहान आहेत. ते योगायोग आहेत असेही वाटू शकतील, परंतु हा अनुभव तशा प्रकारचा नाही. माझ्या सवयीनुसार येणाऱ्या अनुभवावर मी कधीही अंध श्रद्धेने विश्वास ठेवला नाही. कुठल्याही गोष्टीवर स्थिर बुद्धीने विचार करूनच मी माझे ठाम मत नक्की करतो.

श्री सद्गुरू साईबाबांच्या कृपेने येणाऱ्या प्रत्येक अनुभवामागे एक दैवी संकेत असतो. मोठे तत्वज्ञान सहजपणे शिकवून माणसाला सांसारिक दुःखाच्या बंधनातून मुक्त करण्याचे कार्य प्रत्यक्षात ईश्वराकडून केले जात आहे. म्हणून त्यातील गूढ अर्थ शोधून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न आपले प्रथम कर्तव्य समजून मी करत रहातो असे असूनसुद्धा ही माया फार विचित्र आहे. आपली प्रयत्नाची पराकाष्ठा असूनसुद्धा काही काही वेळा आपला पाय ह्या मायेच्या जाळ्यात अडकतोच आणि मग मात्र मनात

भावयुक्त श्रद्धा रहात नाही. पडल्यावरही जो स्वतःला सांभाळेल, त्याच्यावर साईकृपा झाल्यावाचून रहात नाही. साईकृपा म्हणजे असंख्य पातकांचा नाश. परंतु सतत भाव-युक्त भक्ती हवी. आपल्या संतांनी आणि निस्सीम भक्तांनीही भावयुक्त भक्तीवरच भार दिलेला आहे.

## देव भावाचा भुकेला
## भाव तेथे देव

( चाल : आओ बच्चो तुम्हे दिखाउ झाकी हिन्दुस्तानकी )

साईबाबा बोलले हे ऐक चित्त देऊनी रे ।
सार साऱ्या संसाराचा साई सखा सांगतो रे ॥
अनन्य भावे भक्त येती माथा ठेवी पायि माझे ।
योग क्षेम चालविणे हे मानितो मी ब्रीद माझे ॥

× × ×

साई भावाचा भुकेला, साई प्रेमाचा भुकेला ।
भक्ति भावाची पुजा साई स्विकारी शिर्डीला ॥

× × ×

संत ज्ञानेश्वर म्हणतात : भावेविण भक्ति । भक्ति विण मुक्ति
बळे विण शक्ति । बोलू नये

× × ×

असाच अत्यावश्यक भाव सतत ठेवण्याचा प्रयत्न करून श्रीसाईबाबांचा प्रत्यक्षात झालेला अनुभव लिहित आहे, आणि आपण वाचकहि तसाच भाव साईपदी ठेवून वाचालच.

मी १०–११ वर्षांचा असताना, आईवडील दोघेही साईभक्त असल्याने, दर गुरुवारी आरती करणे व प्रसाद अर्पण करणे हा नियम. आरती माझे बंधु विजयसिंह करत असत व प्रसाद मी अर्पण करत असे.

प्रसाद सर्वांना वाटून झाल्यावर उरलेले एक दोन पेढे साईबाबांच्या पायाजवळ मी ठेवत असे. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी दर्शन घेण्यास गेल्यावर तो प्रसाद खात असे.

माझ्या अशा ह्या सवयीमुळे आईकडून सूचना देण्यात आली की 'रात्रभर उघडा राहिलेला प्रसाद तू खात जाऊ नकोस, तो मुक्या जनावराच्या तोंडी लागू दे.'

बाल वयात आईच्या सूचनेचा अर्थ लक्षात आला नाही. साईबाबांवर भोळा भाव असल्यामुळे मी विश्वासानं म्हटले की, 'साईबाबा आहेत मला काहीच होणार नाही.' ह्यावर आई काहीच बोलू शकली नाही.

नियमानुसार गुरुवारी प्रसादाचे पेढे साईबाबांच्या पायाशी ठेवून रात्री झोपलो, तो पहाटेच्या सुमारास स्वप्नात मी पेढे खाण्यासाठी हात पुढे केला तोच साईबाबांच्या मूर्तीने सजीव झाल्याप्रमाणे नकारात्मक मान हलवली. तरीही मी हात पुढे नेला आणि पुन्हा साईबाबांनी जास्तच जोरात मान हलवली. जेव्हा मी पेढा हातात घेतला तेव्हा मात्र साईबाबांनी नाराजी व्यक्त करून पाठच फिरवली. त्यानंतर मात्र माझी प्रसाद खाण्याची हिम्मत झाली नाही आणि मी पेढा हातातून तसाच खाली ठेवला.

आश्चर्याची गोष्ट अशी की, सकाळी आईला हे स्वप्न सांगून दर्शनास गेलो, तेव्हा पेढ्यावर एक पाल पेढा खात असलेली पाहिली. तात्काळ आईला बोलावून प्रत्यक्षात घडलेला अनुभव दाखवला.

त्या प्रसंगी आईला झालेल्या आनंदाचे आणि समाधानाचे भाव हेच सांगत होते की—

जन्म दे त्या माऊलीचे काम ह्या
साईमाऊलीने पूर्ण केले !

त्या वेळेस आम्हा माय लेकरांना प्रसाद न खाण्यात झालेला आनंद आणि समाधान व्यक्त करण्यास शब्द नाहीत. परंतु साईबाबांच्या अभंगाची सत्यता मात्र आज मनाला पटली आहे.

जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥
नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ।
नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥
जो जो मज भजे जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मी ही त्यासी ॥

# माझे साईबाबा!

—सौ. प्रेमला शं. मैराळ
' हेरंब ' गणेश बाग
मैराळवाडी, बडोदे–३९००१३

● माझे बाबा, आमचे सर्वांचे बाबा, असंख्य भक्तांचे बाबा, तुमच्याविषयी खूप खूप बोलावसं वाटतं, खूप खूप लिहावसं वाटतं, तुमच्याच गोष्टी सारख्या ऐकाव्याशा वाटतात, तुमची भजनं ऐकण्यासाठी कान सदा आतुर असतात. तुमच्या फोटोकडे, मूर्तीकडे, समाधीकडे कितीही वेळ पाहिलं तरी तृप्ती होत नाही.

खरंच साईबाबा कां इतकी माया लावलीत ? मी पूर्वी तर नास्तिक होते. साधू संत म्हटले की, मला त्यांचेविषयी मुळीच प्रेम वाटत नसे. फक्त श्री ज्ञानेश्वर माऊली व श्री तुकाराम महाराज ह्या दोन श्रेष्ठ संतांविषयी मात्र मला अतिशय आदर वाटे पण श्री साईबाबांविषयी मला एकदमच काय वाटू लागलं ते मी काहीच लिहू शकत नाही.

माझे भाऊ वहिणी, मुली, नाती, सर्वच आता साईभक्त आहेत. प्रथम माझ्या भावाने मला श्री साईबाबांचा फोटो सहज म्हणून दिला, व माझ्या वहिणीने श्रीसाईंची पोथी ' स्तवनमंजिरी ' दिली. ही मंडळी माझ्या पूर्वीपासूनच श्रीबाबांचे भक्त आहेत. त्या योगाने श्री साईनाथ जे स्वतः होऊन आमचे घरी आले तेव्हापासून त्यांनी आमच्यासाठी कितीतरी गोष्टी केल्या आहेत. आम्हाला पोटाशी धरून प्रेमाने गोंजारून आम्हाला कल्पनाही नव्हती असल्या सांसारिक अडचणी, इस्टेटीच्या बाबतीतील गुंतागुंत, नातलगातील गैरसमज वगैरे अनेक बाबतींना स्वतः हाती घेऊन सर्व गोष्टींचा निकाल सर्वांच्या मनाप्रमाणे करून संपूर्ण समाधान दिले. धन्य आमचे बाबा !

ह्या प्रमाणे श्री बाबांनी आमचेसाठी अनेक गोष्टी केल्या आहेत. अनेक चमत्कार करून पावलोपावली ते आम्हाला सांभाळीत आहेत. कोणता अनुभव, कोणती प्रचिती, केवढे त्यांचे प्रेम त्याविषयी किती लिहिणार ! शब्द आठवत नाहीत. डोळे प्रेमाश्रुंनी भरून येतात.

त्यांच्याच प्रेरणेने त्यांच्या पादुका बनवून शिर्डीस मूर्तीचे पायाजवळ दिवसभर ठेवून समाधीस लावून घरी पूजेमध्ये ठेवल्या आहेत. ' श्री साईसच्चरित ' चे वाचन व मोठ्या समारंभानेएका विद्वान पंडीतजीकडून .केले एकदा त्या पोथीचा एक सप्ताह

झाला. घरात छोटेसे मंदीरमय वातावरण आहे. दर गुरुवारी ' साईदरबार ' रेकॉर्डच, एक छोटासा कार्यक्रम व प्रसाद, आरती वगैरे सोहळा त्यांच्याच कृपेने होत असतो. भक्तमंडळी येतात. सर्व वातावरण साईमय होते. गायक श्री. जलोटा ह्यांच्या ' श्रीसाई वंदना ' व ' श्री साई स्तुती ' ह्या रेकॉर्ड व ' सुरलोकची चौमुख निर्मित कॅसेट ' ह्यांचे वादन नेहमीच चालू असते. ही सर्व बाबांची भजने मनाला फारच आनंद देत असतात.

आम्हाला मुलगा नाही. पण दोन गुणी मुली आहेत. त्या त्यांच्या संसारात पूर्ण सुखी आहेत. एका मुलीला दोन मुली आहेत. त्या दोघीही साईभक्त आहेत. एक मोठी गुरुवारचा कडक उपवास करते, व धाकटी आता दहावीत आहे. ती ' साई-महात्म्य ' वाचण्यास एक दिवसही चुकत नाही. मोठ्या मुलीची मुलगी आमची तिसरी नात तिला बाबांच्या कृपेने एक गोड तेजस्वी मुलगा ( आमचा पणतू ) झाला आहे. त्याला श्रीबाबांनी फार मोठ्या आजारातून वाचविला आहे. इतर सर्वच कुटुंबियांना बाबांनी वेळोवेळी धावत येऊन साह्य करून आम्हाला त्यांचे अनंत जन्मांचे ऋणी करून ठेवले आहे.

अशा ह्या परमकृपाळू दयाघनाविषयी आणखी काय लिहिणार ? शेवटी एकच म्हणजे आमचे सर्वस्व आमचा एकमेव आधार आमचे कनवाळू ' बाबा ' आमचे देवाधिदेव ' श्री साईनाथ ' ह्यांचे मंगलचरणी अनंत कोटी प्रणाम करून प्रार्थना की--

बाबा तुमच्या अमृतमय नामाचा कधीही विसर पडू देऊ नका.
तुमच्या मंगलमय चरणापासून कधीही दूर लोटू नका हीच प्रार्थना.

# प्रत्यक्ष भेटलेले साईबाबा

—श्री. सुरेश सातपुते
लालबाग मुंबई १२

● श्री समर्थ साईबाबांपुढे केलेली प्रार्थना कळकळीची असली की, ती कधीच व्यर्थ जात नाही हा माझाच नव्हे तर, आज दुनियेचा अनुभव झाला आहे. १९७९ च्या मार्च एप्रिल महिन्याचे दरम्यान काही नवीन धंदा सुचवा अशी प्रार्थना मी समर्थांना केली. त्यावर ' फेस पावडर ' काढण्याचा आदेश समर्थांनी मला दिला.

त्यानंतर जुजबी माहिती, मशिनरी व मुख्य म्हणजे उत्पादनाचा परवाना मिळविण्यात जवळ जवळ वर्ष सव्वा वर्ष गेले. तथापि धंदा सुरू होण्यापर्यंत काम यशस्वी झाले होते. जरी धंदा सुरू झाला तरी पूर्ण माहितीचा अभाव, आत्मविश्वास डळमळीत अशी त्रिशंकू अवस्था असून देखील धंद्याची सुरुवात तर छान झाली. तथापि आत्मविश्वासाअभावी अनेक शंका कुशंका मनामध्ये येत असत.

आणि व्यावसायिकात मुळीच नको असणारे हे वैगुण्य साईसमर्थांनी प्रत्यक्ष भेटून कसे काढून टाकले याची सत्य हकीकत सांगतो.

वरील प्रकारे धंदा सुरू केल्यानंतर एके दिवशी सकाळी मशीद बंदर येथे जाण्याकरिता निघालो. परंतु तत्पूर्वी अभ्युदयनगर काळाचौकी येथे आमचे साईभक्त मामा रहातात त्यांना भेटून तेथून हारबर पकडून मशीदला जावे या विचाराने झप झप चालत होतो. सोबत आमच्या येथे कामाला असलेला मुलगाही होता. आम्ही दोघेही बाईतच चालत होतो इतक्यात—

' अरे बाबा, शिर्डीका सवाल है। ' असे खणखणीत आवाजातले शब्द कानी आले, आणि ब्रेक लागावा तसा गचकन् थांबलो आणि हे शब्द उच्चारणारी व्यक्ति कोण अशा विचाराने शोधक दृष्टीने आजुबाजूला पाहू लागलो. परंतु समोर नजर जाताच ती व्यक्ति माझ्या अगदी निकट उभी असल्याचे पाहून मी आश्चर्य चकीत झालो—

ती व्यक्ती उंचीने बुटकी होती. डोक्यावर साईबाबांसारखाच परंतु लालसर रंगाचा एक रुमाल गुंडाळलेला होता. दाढी व चेहऱ्याची ठेवण जवळ जवळ सारखीच

होती. अंगावर हिरवा सदरा होता परंतु त्याची लांबी मात्र गुडघ्याच्या खाल पर्यंत होती. तसेच सफेद परंतु मळकट अशी लुंगी ते नेसले होते. हातात जवळ जवळ त्यांच्या उंची एवढीच काठी होती. पायात काहीच नव्हते. मी त्यांचे खाल पासून वर पर्यंत निरक्षण करीत असता, ते हिंदी मराठी सरमिसळ करून बोलू लागले.–

'आरे कवा पासने तुजीच वाट बघत हुतोना. इधं मुझे शिर्डी वापस जाना है।' मी मुळातच घाईत असल्याने फारसा विचार केला नाही. म्हटले असेल कुणी भिकारी टोकारी नाही तरी आजकाल साईबाबांसारखा पेहराव करून लोकांच्या भाविकतेचा फायदा उठविणाऱ्यांचा सुळसुळाट आहेच. त्यातलाच हा कोणी असावा असेही वाटले तथापि आपल्या प्रिय दैवताचे नाव हा घेत आहे त्या अर्थी त्याला विन्मुख तरी कशाला पाठवा ! असा विचार करून मी खिशात हात घातला तोच ते म्हणाले—

'नहीं, नहीं, मुझे शिर्डी वापस जाना है। मुझे सव्वा रुपया दे दे। त्यासाठीच तर तुजी कवा पासनं वाट बघत हुतो न मी मुझे सव्वारुपयाही चाहिये।'

तथापि हा देखील, भिकाऱ्याचा एक स्टंटच असेल असे मला वाटत असतानाही मी मुकाटपणे सव्वा रुपया काढून दिला. तो स्विकारून ते म्हणाले.

'जा आता लवकर निघ. इथून पुढं तुजे सगळ चांगले होईल. जा जा लवकर' पसे दिल्यानंतर भिकारी असाच काहीसा आशिर्वाद देतात हे जाणत असल्याने मी मनाशीच हसत पुढे निघालो तोच ते पुन्हा बोलावून म्हणाले–

'अरे तू त्याची कसली चिंता करतोस ? हम है ना' आणि नंतर त्यांनी ते अद्‌भूत वाक्य उच्चारले 'अरे तू इतनी फिकर क्यूं करता है। नंतर स्वतःच्या दाढीला स्पर्श करून म्हणाले अरे, तु माझ्या सारखा म्हातारा होशील बाबा ! माझ्या सारखा म्हातारा होशील. तुज इथून पुढे सगळे चांगले होईल. जा आता जा थांबू नको. निघ लवकर' असे म्हणून त्यांनी मला जवळ जवळ हाकललेच.

वाचकहो, वरील संवाद साधाच वाटतो ना ? पण तसा तो नाही. स्वतःच्या दाढीस हात लावून उच्चारलेले 'माझ्या सारखा म्हातारा होशील बाबा ! हे वाक्य फारच अर्थपूर्ण आहे खास साईतंत्राने उच्चारलेले हे वाक्य आहे. असंबद्ध वाटणारे असे काही तरी बोलावयाचे परंतु समोर असलेल्या मंडळी पैकी कुणाला तरी त्याच्या मनातील शंकेचे उत्तर अपरोक्षपणे देऊन टाकायचे हे साईचे देहधारी असल्यापासूनचे तंत्र आहे. वरील वाक्य देखिल त्याच तंत्रावर हूकूम त्यांनी उच्चारलेले आहे.

त्या उच्चारणाने, माझ्या मनात त्यापूर्वी वर्षा दिडवर्षा पासून रात्रं दिवस जाळीत असणाऱ्या एका भीतीचे निराकरण साईबाबांनी केले होते. वरील वाक्याद्वारे माझ्या मनातील भीतीचे उत्तर बाबांनी अपरोक्ष पद्धतीने देऊन टाकले. या पेक्षा चमत्कार तो कोणता ?

इतके झाले तरी हे खरोखरीच साईबाबाच असतील असे मला वाटले देखील नाही, आणि पुढील क्षणी इथे काहीतरी वेगळे घडले आहे, त्यांनी आपल्या मनातील गोष्ट ओळखून त्याचे उत्तर आपल्याला दिले आहे, याची जाणीव मला होऊन मी चक्रावून गेलो, आणि त्यांचे चरण धरण्यासाठी मी त्यांना शोधू लागलो. पण ते मला कुठेच दिसेनात. त्या ठिकाणाच्या चारी बाजूचा परीसर नजरेच्या अगदीच स्पष्टपणे टप्प्यात असूनही अगदी पाठमोरे जाताना सुद्धा दिसले नाहीत ती जागा अगदी मोकळ्या मैदाना प्रमाणे असल्याने एकादे जलद गतीचे वाहनही, तितक्या अल्प वेळात नजरे बाहेर जाऊ शकले नसते मग ते गेले कुठे ?

आणि त्यांचे चरणही न धरल्याबद्दल अत्यंत खंत करीत मी पुन्हा रस्त्याला लागलो त्या दिवशी व नंतर अनेक दिवस मला स्वतःच्या दुर्भाग्याचे दुःख होत होते. आणि आजपर्यंत देखील ज्या ज्या वेळी मला तेथून जाण्याचा प्रसंग येतो त्या त्या वेळी माझी नजर नकळत त्या ठिकाणी त्यांना मोठ्या आशेने धुंडाळीत असते. परंतु अद्याप ते मला तेथे वा अन्य कोठेही अजून भेटलेले नाही, जर भेटले तर, त्याची इत्यंभूत हकीकत तुम्हाला जरूर सांगीन.

## श्रीसाईलीला

श्री साईलीला मासिकाच्या शिर्डी येथे ३० व ३१ जानेवारी १९८३ रोजी भरणाऱ्या लेखक–कवी समेलनाचे अध्यक्ष कोल्हापूरचे डॉ. रा. सी. कापडी एम. बी. बी. एस. यांचा विस्तृत परिचय फेब्रुवारी १९८३ अंकात वाचा.

# माझे प्राणदाते–श्रीसाई

—सौ. सरिता रमाकांत पतंगे
'राजदीप' संत तुकाराम मार्ग
मुलुंड (पूर्व)

● श्री साई स्तोत्रामध्ये म्हटलेच आहे की, कोणाचे मरण टाळिले ॥ कोणा आपत्तीतूनी सोडविले ॥ मोक्षमंदिराचे दार उघडिले ॥ ऐसे उद्धरिले अनेक ॥ हे बोल अगदी सत्य आहेत.

साईनाथांवर माझी दृढ श्रद्धा बसायला माझी मोठी बहिणच कारणीभूत आहे. तिच्या पतीच्या तोंडून (माझ्या मेहुण्यांच्या) साईनाथांविषयी खूप अनुभव ऐकले होते. साईनाथ हयात असताना त्यांनी वडिलांबरोबर खूप वेळा दर्शन घेतले होते. त्यामुळे त्यांची लहानपणापासून बाबांवर खूप श्रद्धा बसली. त्यांचे वडील वारल्यानंतर शिर्डीचे जाणे आपोआपच खंडित पडले. ते बाबांची कृपा झाल्यामुळे मला बहिणी-बरोबर शिर्डीस जावयास मिळाले. साईनाथांचे दर्शन घेतले अन् माझे चित्त आनंदित झाले. द्वारकामाईतला धुनीजवळचा साईबाबांचा फोटो पाहून मला व बाईला हलूच नये असे वाटे. एकाग्रतेने बाबांकडे पाहिल्यास बाबांचे ओठ हलतातसे वाटे व डोळेही खूप बोलके वाटत.

त्यावेळच्या ४–५ दिवसांच्या मुक्कामात काकडआरती, मध्यान्हीची आरती, सायंआरती, शेजारती जरासुद्धा चुकविली नाही. शिर्डीहून निघताना खूप वाईट वाटत होते.

मी तिकडून येताना दासगणूंची स्तवनमंजिरी व बहिणीने 'श्री साईसच्चरित' दाभोलकरांची पोथी आणली होती. रोज सकाळी स्नान झाल्यानंतर मी स्तवनमंजिरी मोठ्या प्रेमाने वाचीत असे. त्याचा परिणाम म्हणून की काय माझा अडलेला विवा-हाचा योग जुळून आला, व बाबांच्या कृपेमुळे सर्व ठीक झाले. सहा सात वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. मी जो अनुभव सांगत आहे तो असा :—

माझ्या सासूबाई वृद्धापकाळामुळे जास्त करून कॉटवरच असत. माझी मोठी बहीण जी बाई, जिने मला शिर्डीला नेले होते, ती खूप आजारी असल्यामुळे औषधा-साठी मुलींसहित माझ्याकडेच आली होती, तिचे पती दहा वर्षांपूर्वी मृत झाले होते.

आमच्या इकडच्या डॉ. प्रधानांचा तिला गुण येत असे. बाबांची उदी तर नित्य चालू असे. तो दिवस रविवारचा होता. त्या दिवशी मच्छीचे जेवण होते. आजारी बहीण व वृद्ध सासूबाई यांचे पथ्याचे जेवण वेगळे व घरातले सर्वांचे जेवण वेगळे. सर्वांची जेवणे आटोपल्यानंतर मी स्वयंपाक घरातली आवराआवर करून जरा विश्रांतीसाठी चटईवर पडले. तोच मला कसेसेच व्हायला लागले. थोड्या वेळाने मला जोराची उलटी झाली. मला आता बरे वाटेल असे वाटले. परंतु पुन्हा उलटी झाली. नंतर उलट्यांचे सत्र सुरू झाले. रविवार असल्यामुळे दवाखानाही बंद. उलट्या होता होता जुलाबही सुरू झाले. घरातली सर्व मंडळी घाबरली. घरगुती औषधे चालूच होती.

मी एकवीराचे व साईबाबांचे स्मरण केले. जुलाब उलट्यामुळे मी फारच हैराण झाले. दोन तीन तास जुलाब व उलट्यांच्या सत्रामुळे मी इतकी क्षीण झाले की, कोचा वर झोपले तेव्हा हातपाय थंडगार पडले. मी घाबरले. आता आपला मृत्यु जवळ आला. पण त्याच वेळेस मधल्या दरवाजाच्या वर अधांतरी मला साईबाबा दिसले. फक्त गळ्यापर्यंतचा भाग, गुलाबी वर्ण आणि मजकडे एकटक नजर लावून बघत असलेले जरासुद्धा पापणी लवत नव्हती. त्या नजरेत आश्वासक प्रेम होते. तू घाबरू नकोस. तुझा मृत्यू दूर गेला. ते वाचेने काहीच बोलले नाहीत. दृष्टीनेच बोलले.

मी त्यांना म्हटले–बाबा, तुम्ही आलात, मला केवढा धीर आला. हा सर्व त्रास मला मच्छीमुळे झाला. म्हणून मी पुन्हा केव्हाही मटण, मच्छी, अंडी काहीही खाणार नाही. सर्व सोडून दिले. लगेच बाबा अंतर्धान पावले. ते कुणालाच दिसले नाहीत. मलाच त्यांचे दर्शन झाले. माझा प्राण वाचविण्यासाठी बाबा धावून आले होते. बाबांच्या कृपा दृष्टीमुळे उलट्या ताबडतोब थांबल्या व जुलाब पण हळूहळू कमी होत संपूर्ण थांबले. मला बाबांचे पुष्कळ अनुभव आलेले आहेत. असे माझे प्राणदाते बाबा. त्यांना अनेकवार प्रणाम !

★

# श्री शंकराचे जागृत स्थानः—पापनाशी तीर्थ

—श्री. गौरुराम गोविंद उरणकर
मु. पो. पनवेल ता. पनवेल
जिल्हा रायगड ४१०२०६

● संत परंपरा सुजलाम सुफलाम करणारी भारत ही अनेक संतांची पुण्यभूमी. विशेषतः आपल्या महाराष्ट्रात आध्यात्मिक प्रांगणात प्रसंगोपात अनेक एकाहून एक अशा संतरत्नांनी अनेक वेळा वेळोवेळी अवतार घेऊन त्यांच्याच पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या भूमीत संतरत्ने उदयाला आली आहेत, आणि त्यांनी आपल्या आध्यात्मिक जीवनाच्या मार्गांनी लीलालाघवी, ऐश्वर्य योग त्रिभुवनात प्रत्यक्ष आचरून भक्ती मार्गाची ज्ञान पताका फडकवित संसारी जीवन कलहात त्रासलेल्यांच्या मनाला शांती देवून त्यांना सत्संग मार्गाला लावून त्यांचे यथासांगपणे लालन पालन व पोषण केले आहे. त्याच प्रमाणे या संतानी पावन कृतार्थ झालेल्या या महाराष्ट्राच्या भूमीत अनेक देव देवतांची जागृत देवस्थाने ही आहेत अशा या प्रसंगोपात अनेकवेळा अवतार घेतलेल्या संतानी आणि अनेक देव देवतांच्या जागृत स्थानांनी बहरलेल्या या महाराष्ट्राच्या भूमीच्या कुशीत उस्मानाबाद बीड या राजमार्गावर येरमाला येडशी जवळच 'पापनाशी तीर्थ' नावाने ओळखले जाणारे श्री शंकराचे जागृत देवस्थान त्यापैकी एक आहे.

या देवालयाचा गाभारा हेमाडपंथी असून सभागृहाच्या इमारतीचे बांधकाम पेशव्यांच्या काळातले आहे असे वाटते. मंदीराच्या कडेने प्रशस्त ओवऱ्या असून चार पाचशे भाविकांना थांबता येईल असा मोठा परिसर आहे. हे शिवलय चारी बाजूच्या उंच टेकड्यांच्या कपारीत असले तरी ते २०/२५ फूट उंचीवर बांधलेले आहे. अलिकडेच या मंदिराच्या चारी बाजूनी दगडी बांधकामाने मजबूत तट बांधलेला आहे. जवळच पिछाडीस नितांत सुंदर असा पुष्करिणी नावाच. छोटासा तलाव आहे याचे बांधकाम देखिल पाहाण्यासारखे असून त्यात उतरण्यासाठी पायऱ्याही ठेवलेल्या आहेत. या भागात भयानक दुष्काळ पडला तरी गोमुखातून पुष्करिणीच्या तलावात पडणारे पाणी अव्याहत चालूच राहाते त्यामुळे हा तलाव नेहमी जलमय असतो. या तलावात साठलेल्या पाण्याचे तीन भाग करण्यात आले आहेत. गोमुखाच्या जवळच्या पाण्याचा उपयोग धार्मिक पूजा विधीसाठी व पिण्यासाठी करतात. दुसऱ्या भागाचे पाणी आंघोळी

साठी उपयोग करण्यात आला आहे. तर तिसऱ्या भागाचे पाणी धुण्यासाठी उपयोगात आणतात या पाण्याचा प्रवाह नितळ व पारदर्शक आहे.

पुष्करिणीच्या मधोमध एक छोटेसे शिवमंदीर आहे. हेच ते मुख्य मंदीर होय. या मंदीराचे बांधकाम इंदूरची राणी अहिल्यादेवी होळकर यांनी केले आहे. त्यासाठी १०५ एकर जमीन सुद्धा इनाम म्हणून दिली आहे. पण हा सर्वभाग डोंगराळ असल्यामुळे त्यापासून शेती सारखे काही उत्पन्न येत नाही. आजूबाजूच्या परिसरात बेल, नारळी, बोर, चिंच, आंबा, जांभूळ, आदी फळांची झाडे आहेत. मंदिराच्या देखरेखीसाठी आणि पूजेसाठी एक पुजारी गुरव आहे.

या शिवालयाच्या बाबत यवनांच्या कारकीर्दीत आक्रमक युद्धे झाली याची साक्ष म्हणून तेथे अनेक भग्नावस्थेत असलेल्या मूर्ती आढळून येतात. तसेच सृष्टी निर्माण करत्या श्री भगवान विष्णूची व गणपतीची मूर्ती भंगलेल्या अवस्थेत पडलेल्या आहेत. या मंदीराच्या संरक्षणार्थ बावीस लढाया झाल्या असाव्यात आणि त्यासाठीच पुष्करिणीच्या कडेने बावीस वीरांच्या शिळा ठेवण्यात आलेल्या आहेत. सतीचे प्रतीक म्हणून उजव्या हातात बांगडी असलेली कोरलेली शिळा येथे पाहाण्यास मिळते.

एकदा उत्तर प्रदेशाच्या एका युध्दात सत्वशील देवी अहिल्याबाई होळकर यांचे पती खंडेराव युध्दात कामी आले व त्यामुळे देवीवर अरिष्ट कोसळले म्हणून त्या आपल्या पतीबरोबर सती जाण्यास निघाल्या पण त्याना मुलबाळ नसल्यामुळे अशा परिस्थीतीत सती जाणे योग्य नाही असे त्यांना त्यांच्या वडिलधाऱ्या मंडळींनी सांगून या कृत्यापासून बाजूला सारले व तिथपासून उर्वरित आयुष्य ईश्वराच्या चिंतनात, हरिभजनात व दान धर्मात घालविण्याचा निश्चय करून त्यांनी देशाटनास जाण्याचा प्रारंभ करण्याचे टरविले. देशाटन करीत असता ठिकठिकाणी त्यांनी शेकडो देवालये, धर्मशाळा घाट वगैरे येणाऱ्या भाविकास उपयुक्त अशा सुखसोयीनी बांधले व त्याच बरोबर लोकोपयोगी गोष्टी पण केल्या.

अहिल्यादेवी देशाटनास निघाल्या असता फिरत फिरत त्या चोराखळी ( पूर्वीचे सोनाखळी नावाने ओळखले जाणारे गाव ) येथे आल्या त्यांनी हे शिवमंदीर पाहिले तसेच तेथील निसर्गरम्यतेने, गांभिर्याने आणि पावित्र्याने अशा या त्रिकुट संगमानी प्रसन्न मुक्त झालेल्या या डोंगराळ परिसरातील वातावरणाने त्या भारावल्या आणि तेथील ग्रामस्थ प्रमुखांना बोलावून पापनाशी शिवालय ते तुळजापूर असा रस्ता बांधावा व त्यासाठी जो काही खर्च येईल तो मज जवळ असलेले सोने आपणाकडे देते असे

म्हणून त्या गावकऱ्यांचा निरोप घेवून ५।६ वर्षांनी त्या पापनाशी शिवालय ते तुळजापूर हा मार्ग पाहण्यासाठी चोराखळीला परत आल्या. परंतु पाहता तो रस्ता बांधलेला नव्हता सरते शेवटी त्यांनी संबंधित ग्रामस्थ प्रमुखांना बोलाविले अपमान पदरात पडलेल्या ग्रामस्थांनी खाली माना घालून ते अहिल्यादेवीच्या समोर उभे राहिले. रस्त्याबद्दल कोणीही चक्कार शब्द बोलण्यास तयार होईना. तेव्हा त्या काय समजायचे ते समजल्या आणि संतापून म्हणाल्या जनता–जनार्दनाच्या कार्यासाठी दिलेले सोने स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी उपयोग केलेल्या या सोनारवळी गावाचे नाव ऐवजी यापुढे चोराखळी असे नाव राहिल आणि तेव्हा पासूनच सोनाखळी गाव हे चोराखळी गाव या नावाने प्रसिध्दीस आले.

चोराखळी जवळच हे 'पापनाशीतीर्थ' आहे. हे तीर्थ स्थान अतिशय सुंदर असे निसर्ग रमणीय शांत तसेच गांभिर्याने आणि पावित्र्याने नटलेले असून तेथील स्वच्छ नितळ पाण्याच्या प्रवाहात पुष्करिणीच्या तलावात लाल कमळाचे काही वेळ तसेच पांढऱ्या कमळांची फुले डोलू लागतात. ही निसर्ग सौंदर्य शोभा अतिशय रम्य विलोभनीय आहे.

अशा ऐतिहासिक परमार्थिक नैसर्गिक निसर्ग सौंदर्यता प्राप्त झालेल्या या ताथांच्या ठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीला, श्रावणी पौर्णिमेला आणि श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी येथे मोठी यात्रा भरत असते. विशेष करून श्रावण महिन्याच्या सोमवारी श्री शंकराचे माहात्म्य इतर देवदेवता पेक्षा कांकणभर जास्तच असते. म्हणून प्रत्येक श्रावण सोमवारी या शिवमंदीरात शंकराला रुद्राभिषेक करण्यासाठी या मंदीराच्या गाभाऱ्याला भक्तांच्या गर्दीला उधान आलेले असते. असे हे श्री शंकराचे पापनाशी तीर्थस्थान जागृत असून संसारी जीवन कलहात नाडलेल्यांच्या कुणाच्याही मनाला शांतता व प्रसन्नता कसलाही खर्च नसताना मिळवून देणारे आहे. आणि आजकाल देखिल ते सर्व जनताजनार्दनाला साद देत आहे. यापुढेही ते साद देत राहो अशी श्री शंकराच्या चरणी प्रार्थना ॐ नमः शिवाय ! ॐ नमः शिवाय ! ॐ नमः शिवाय ! ॐ नमः शिवाय !

# ☆ अन्नपूर्णा साई ☆

—श्री स्वामी संजयानंद
बद्रीनाथ, हिमालय

● लखनौच्या भूमीवर घडलेली सत्य घटना म्हणा किंवा साईबाबांची लीला.

१९७२ साली मे महिन्यातील गोष्ट. उत्तर प्रदेशातील उष्णतामान काही विचारता सोय नाही. त्याच्यात लखनौ शहरात उन्हाच्या झळा मारतात. दुपारी घराच्या बाहेर पडणे मुश्किल अशा ह्या उन्हाळ्यात घडलेला साईंचा चमत्कार.

आम्ही उभयता पती-पत्नी त्यावेळी कानपूरला होतो, व लखनौला आम्हाला कार्यक्रमासाठी तेथील साईभक्त श्री. सुशीलचन्द्र वर्मा ह्यांनी निमंत्रण दिले. आम्ही लखनौला आलो. श्री. वर्माजींनी आम्हाला सुचविले की, आता तुम्ही दोघे आला आहात तर एक जाहीर कार्यक्रम ठेवा. त्यावर मी संमती दिली. रात्रभर भजन, व दुसरे दिवशी गरिबांना अन्नदान करणे असा कार्यक्रम ठरला. ज्या दिवशी भजन होते, तो दिवस रविवार होता. भजनाच्या अगोदर साईसहस्त्रार्चन ठेवले होते. प्रत्येक साईभक्तांना १०० ग्राम बासमती तांदूळ व बाबांचा फोटो आणायला सांगितला होता. कारण प्रत्येकाला 'साईनामा' च्या नावाने केलेल्या अभिषेकाचा आनंद मिळावा.

साई सहस्त्रार्चन झाल्यावर तो तांदुळ गोळा करण्यात आला. तो मोजल्यावर सोळा किलो भरला. तो एका कपड्यात बांधून आम्ही साईबाबांची सजावट केलेल्या जागेवर ठेवला, व अखंड भजनास सुरुवात केली. दुसरे दिवशी सोमवार सकाळी आरती करून भजन कार्यक्रम संपवला. दुपारी तो तांदुळ 'साखरभात' शिजवून त्याच दिवशी तीन ते चार वाजता तेथील गोमती नदीच्या किनाऱ्यावर असलेले 'मनकामेश्वर' मंदिरात जाऊन तेथे गरिबांना अन्नदान करावयाचे ठरविले. त्या दिवशी मनकामेश्वरच्या मंदिरात यात्रा होती.

दुपारी अकरा वाजता आम्ही बंगल्याच्या बाहेर अंगणात एक विटांची चूल करून तो साखरभात करायला सुरुवात केली.

ज्या पातेल्यात आम्ही साखरभात करणार होतो, ते पण १६ किलोपर्यंत तांदुळ मावेल एवढेच होते.

• आम्ही तांदुळ शिजत ठेवले व तो तांदुळ पातेल्याला खाली लागू नये म्हणून दोघे पती-पत्नी मोठे चमचे घेऊन भातामध्ये मधून मधून फिरवित होतो. बाकी सर्व साईभक्त बाजूला बसून पहात होते. अत्यंत कडक उन्हामुळे आम्ही सर्वजण घामाघूम झालो होतो. भात कधी शिजेल ह्याची आम्ही वाट पहात होतो भात शिजत असताना पाण्यावर बुडबुडे येऊ लागले. थोड्या वेळात ते सर्व बुडबुडे ओम ( ॐ ) च्या आकारात बदलून संपूर्ण ॐ तयार झाला व त्या ॐचा रंग उदीसारखा होता. हा चमत्कार सर्वांनी पाहिला. सर्वांना बाबांविषयी प्रेम उचंबळून आले.

शेवटी भात उदीच्या रंगात शिजला. तो भात पातेल्यात मावेनासा झाला व उतू जावू लागला. आम्हाला वाटले की १६ किलो भातासाठी पातेले लहान पडले म्हणून घरातून एक रिकामे पातेले मागवून उतू जाणारा भात त्याच्यात काढला. त्या रिकाम्या पातेल्यात भात काढला नाही तोच भात परत उतू जाऊ लागला. म्हणून आणखी एक पातेले मागवले. ते पण भरले. पण भात काही उतू जायचा थांबला नाही. घरातील सर्व भांडी संपली म्हणून आम्ही शेजारच्या लोकांची भांडी मागवली. ती पण भरली. भात तर वरती येतच होता. हा चमत्कार पहाण्यास लोकांची गर्दी जमू लागली. आम्ही पण साईभक्तांना फोन करून, बाबांचा हा चमत्कार पहावयास बोलावले.

आजूबाजूच्या लोकांची भांडी संपली तर बाजारातून आम्ही चार प्लॅस्टिकच्या बकेट अंदाजे २० लिटरच्या मागविल्या. तोपर्यंत संध्याकाळचे ४ वाजले. सर्व साईभक्त म्हणाले 'स्वामीजी हे असेच चालले तर अन्नदान केव्हा करावयाचे ! एवढा भात वाढायचा कुठे ! मी म्हणालो सर्व हात जोडून बाबांना विनंती करा की, 'बाबा, आता ही लीला थांबवा. त्यावर आम्ही सर्व साईभक्त बाबांची प्रार्थना करताच भात वर यायचा थांबला.

मग ती सर्व भांडी साईभक्तांनी उचलून जेथे बाबांचे मंदिर बनविले होते त्या खोलीत नेऊन ठेवली.

आता एवढी भांडी न्यायची कशी हा प्रश्न पडला ? पण बाबांचे काम ते काय थांबणार !

लखनौ येथील कलेक्टर श्री. राम सहाय हे आपली कार घेऊन आले, तसेच आचार्य नरेंद्र देव ह्यांचे मोठे चिरंजीव श्री. अशोक हे पण आपली गाडी घेऊन आले व दोन साईभक्तांनी आपली गाडी आणली. आम्ही ती सर्व भांडी गाडीमध्ये भरली, व अन्नदान करण्यास निघालो. श्री. सुशील वर्मांनी घराला कुलूप लावले व खिडकीच्या जाळ्या उघड्या ठेवल्या. कारण बाहेरून जाणाऱ्या लोकांना बाबांच्या फोटोचे व मंदिराचे दर्शन व्हावे. रात्री आठच्या दरम्यान आम्ही अन्नदान करून बंगल्यावर परतलो. बंगल्याच्या बाहेर कार उभी केली व आम्ही बाहेर पडून बंगल्याकडे येत होतो. आमच्या मागे सर्व साईभक्त पण येत होते. समोर दरवाजा बंद होता. त्यामुळे माझी नजर खिडकीतून आत बाबांच्या मंदिरात पडली आणि काय आश्चर्य सजावट केलेल्या आतील प्रकाशात बाबांसाठी ठेवलेल्या खुर्चीवर एक पांढरी दाढी असलेला, अंगात केसरी अंगरखा लुंगी घातलेला म्हातारा बसला होता. मी सर्व समजलो की हा म्हातारा दुसरा–तिसरा कोणी नसून स्वतः शिर्डीचे साईबाबाच आहेत. कारण घर सर्व बाजूंनी कडीकुलपात बंद असताना आत प्रवेश कोण करू शकेल? हे काम फक्त बाबाच करू शकतात व हे दृश्य इतर सर्व साईभक्तांनी देखील पाहिले, व त्यांनी सुद्धा हाच अभिप्राय दिला की शिर्डीचे साईबाबाच आपल्याला दर्शन देण्यासाठी आले आहेत. मी सर्वांना शांत रहाण्यास सांगितले, कारण बाबांना पहाताच ते गोंधळ करू लागले होते.

वर्माजींनी कुलूप उघडून आम्ही सर्वांनी घरात प्रवेश केला, आम्ही सर्व जण खाली बसलो. त्यावर बाबा पण खाली माझ्या जवळ येऊन बसले. वातावरण एकदम शांत होते. तेथेच हार्मोनियम तबला ठेवला होता. तो तबला बाबांनी स्वतः घेऊन मला हार्मोनियम वाजवण्यास सांगितले. मी भजन सुरू केले. दोन तीन भजने म्हणून झाली. मग बाबा मला म्हणाले कि आता मी भजन म्हणतो तू तबला वाजव. असे म्हणून हार्मोनियम बाबांनी माझ्या जवळून घेतला, व मला तबला दिला.

बाबांनी भजन म्हणवयास सुरवात केली. पण बाबांच्या भजनावर मला तबल्याचा ताल वाजविता आला नाही.

ह्याच्या आधीची पार्श्वभूमी अशी कि, मला तबल्याचे सर्व ताल वाजविता येत होते पण 'झपताल' वाजविता येत नव्हता. तो शिकायची इच्छा होती पण एका तालासाठी मला गुरु करावा लागणार होता. म्हणून मी बाबांच्या विश्वासावर

खिसंबून राहिलो व ताल शिकणे सोडून दिले. आणि आज तर बाबा स्वतः जे भजन म्हणत होते त्या भजनांचा तबल्याचा ताल 'झपताल'च होता. मी 'झपताल' वाजविण्यास असमर्थ ठरलो माझी असमर्थता पाहून बाबा मला म्हणाले. बेटा 'झपताल' बजाव उसकी मात्रायें दस होती है! असे म्हणून मला 'झपतालाचे बोल शिकविले नंतर मी बाबांच्या भजनावर तबल्याची साथ दिली. बाबांची अगाध लीला तबल्याचे बोल शिकविण्यासाठी बाबांनी भजनाचे निमित्त केले.

थोड्या वेळाने भजन, भोजन कार्यक्रम संपल्यावर झोपावयाची तयारी सुरू झाली. भक्त लोक जास्त असल्याने सर्वांची झोपण्याची सोय बंगल्यात होणार नव्हती कारण कानपूर इलाहाबाद वरून पण साई भक्त आले होते. मी म्हणालो की पुरुष मंडळींनी बाहेर झोपावे, व स्त्रीयांनी आत झोपावे सर्वांनी आपापली अंथरुणे घातली बाबांनी पण आपले अंथरुण माझ्या शेजारी घालावयास सांगितले हळू हळू सर्व साईभक्त निद्रेच्या आधीन झाले, सकाळी साडे तीन चारच्या दरम्यान मला जाग आली व मी माझ्या बाजुला बाबा झोपले होते ते अंथरुण पाहिले ते नुसते रिकामेच दिसले. मला वाटले महाराज इकडे तिकडे गेले असतील पण काय तब्बल अर्धा तास झाला तरी बाबांचा पत्ता नाही. वाट पाहून मी सर्वांना जागे केले, व सर्व परिस्थिती सांगितली सर्वांनाच चुकल्या सारखे झाले बाबांनी सर्वांना मायेच्या अधीन करून स्वतः पलायन केले होते. ते काय परत येण्यासाठी? ते गेले ते गेलेच. आता कसले परत येणार?

असा हा साई आपल्या वचनाला जागला.
जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी
बाबांचे वचन सिद्ध झाले होते.

त्यांनी सर्व भक्तांना दर्शन देऊन कृतार्थ केले. बाबांची ही लीला, चमत्कार सर्वांच्या जीवनात विशेष घटना होय.

अशा प्रकारे कार्यक्रमा अंती सर्व साईभक्त एक वेगळा आनंद, अपूर्व प्रसन्नता, खुशी, शांती आपल्या बरोबर घेऊन आपापल्या घरी परतले.

धन्य ती शिरडी नगरी. धन्य तो तेथला फकिर असा हा सोळा कला परी पूर्ण ईश्वर धरणीवर पुन्हा मिळणार नाही.

'धन्य ती शिर्डी नगरी साईनाथ तो धन्य धन्य
असा हा आगळा ईश्वर न मिळे भूतली अन्य

# जगाच्या कल्याणा। संतांच्या विभूती ॥

—कु. हेमलता नरहर केसकर
घ. नं. १८२, कसबा पेठ
मु. पो. फलटण, ता. फलटण
जि. सातारा, फलटण–४१५५२३

**यदा यदा हि धर्मस्य**
**ग्लानिर्भवति भारत।**
**अभ्युत्थानम धर्मस्य**
**तदात्मानं सृजाम्यहम् ॥**

भगवत् गीता [ अध्याय ४–६ ]

● जेव्हा धर्माला ग्लानि येते, म्हणजे धर्माची बंधने शिथिल होतात, मनुष्य स्वैराचारी बनू लागतो, तेव्हा धर्माची पुन्हा स्थापना करण्यासाठी प्रत्येक युगात मी अवतार घेत असतो. असे भगवान श्रीकृष्णांनी कुरुक्षेत्रावर अर्जुनाला गीता सांगत असता प्रतिपादन केले आहे. 'साईलीला' मासिकातील साईभक्तांनी वर्णन केलेल्या चमत्कृतीपूर्ण साईलीला वाचत असता श्रीकृष्णाच्या वरील उद्गाराची सत्यता पुनीत होते आणि मनोमन खात्री पटते की शिर्डीचे साईबाबा हे खरोखर कलियुगातील २० व्या शतकातील भगवंताचे अवतार होत.

आजचे युग हे विज्ञान युग आहे. या काळात बुद्धीप्रामाण्य मानले जाते. प्रत्येक गोष्ट सिद्ध करून दाखवावी लागते, तिच्या मागची कारणमीमांसा द्यावी लागते. देवाचे, परमेश्वराचे अस्तित्व मानणारे फार थोडे. एखाद्या भाविकाला भक्तिभावाने देवाची प्रार्थना करणाऱ्या भक्ताला–तुम्ही देव पाहिला कां, तो कसा आहे, देवच आहे कशावरून तुम्ही मानता? असे नास्तिकाकडून प्रश्न विचारले जातात आणि त्याचे समाधानकारक उत्तर सामान्य मनुष्याला देता येत नाही. कारण सगुण स्वरूपात ईश्वर दिसणे ही अतिशय कठीण गोष्ट आहे. तथापि ईश्वराच्या ठिकाणी श्रद्धा ठेवून आपण त्याचे अस्तित्व मान्य केले पाहिजे. पण ही श्रद्धाच आज अस्तित्वात नाही. साधुसंताकडे तर संशयाच्या दृष्टीकोनातून पाहिले जाते.

परंतु संतमहंत म्हणजे चालते बोलते देवच होत. मनुष्यदेह धारण केल्या मुळे संत हे आपल्यातील एक वाटतात, पण त्यांच्या कृतीवरुन मात्र ते सामान्य नसून अलौकिक सामर्थ्य असलेले थोर पुरुष वाटतात. शिरडीचे साईबाबा हे त्यापैकीच आहेत. त्यांची राहणी साधी होती, पण विचार सरणी उदात्त होती. आपल्या साध्या साध्या कृतीतूनही काही शिकवण दिली आहे.

संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यापेक्षाही साईबाबा थोर आहेत. कारण नामदेव, तुकाराम यांनी देवाची अनन्य भावे भक्ती केली. पण सामान्य जना पासून ते दूर राहिले. तसे साईबाबा हे सामान्य लोकातच राहिले. ज्ञानेश्वरांनी जे तत्वज्ञान ज्ञानेश्वरीतून सांगितले तेच साईबाबांनी सोप्या भाषेत सांगितले. नाम देवाच्या निस्सीम भक्तिची शिकवण जनतेला दिली. तुकारामांनी जे अभंगातून सांगितले ते बाबांनी प्रत्यक्ष आचरणात आणले.

'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा' ह्या तुकारामाच्या अभंगाप्रमाणे त्यांचे जीवन आहे. साई-बाबांनी कोणताही वेगळा धर्म स्थापन केला नाही, वेगळा पंथ निर्माण केला नाही. जे पूर्वीपासून चालत आले तेच नव्याने सांगितले. फक्त कालमानानुसार त्यात बदल केला. आजच्या काळात सोवळे ओवळे कठीण आहे. एका ठिकाणी बसून नामस्मरण करणे, पारायण करणे अशक्य आहे, कारण आजचे जीवन धावपळीचे आहे. पण साईबाबांनी याचा त्याग करायला सांगितले आहे. 'हरि ॐ बाबा' हा मंत्र त्यांनी दिला. कोठेही असा प्रवासात, ऑफिसात, घरी व अन्य कोठेही वरील मंत्राच्या साहाय्याने साईबाबांचे स्मरण ठेवा. जपण्यास सोपा असा मंत्र आहे. यामुळे आर्थिक हानि नाही. या मंत्राला स्थळ काळाचे, जाती धर्मांचे, उच्चनीचतेचे बंधन नाही. हा मंत्र म्हणजे साईबाबांची मानसपूजा आहे भक्ताकडून फक्त याचीच अपेक्षा साईबाबांनी केली आहे. 'देव भावाचा भुकेला' याप्रमाणे 'हरि ॐ बाबा हरि ॐ बाबा' असे बाबांचे नित्य स्मरण केले असता बाबा भक्तांच्या हाकेला धावून येतात. आचरण्यास सोपा असा भक्तिमार्ग आहे. त्यामुळे साईबाबांच्या दरबारात विभिन्न जातीधर्मांचे लोक आहेत. हिंदू, मुस्लिम, शीख यासारख्या वेगवेगळ्या धर्मांचे भक्त आहेत तसेच वेगवेगळ्या थरातील लोक आहेत. अशिक्षितही करतात. त्यांच्या भक्तगणात स्त्रिया, लहानमुले यांचाही समावेश आहे. कोणी त्यांना घरगुती नात्याने साईबाबा म्हणतात तर कोणी साई राम तर कोणी साईनाथ म्हणून संबोधतात. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन सुद्धा

एखाद्या गोष्टीस विलंब लागतो तेव्हा साईबाबांना शरण गेल्या वाचून अन्य मार्गच उरत नाही. म्हणूनच कोणी म्हणतो साईबाबा माझी इच्छा पूर्ण करा, तेव्हा साईबाबा भक्ताची प्रार्थना ऐकतात, आणि त्याच्या हाकेला धावून जातात कल्प वृक्षाखाली बसून एखादी इच्छा केल्यास ती पूर्ण होते, अशी एक कल्पना आहे. कारण कल्पवृक्ष अस्तित्वात नाही पण साईबाबा मात्र कल्पवृक्षाप्रमाणे आहेत आपण अंतः करणापासून त्यांना विनवणी केली तर भक्ताचे मनोगत ते जाणतात, त्याची इच्छा पूर्ण करतात.

जरी मी गेलो टाकून हे शरीर
तरीही मी धावेन भक्तासाठी

आज देहरूपाने साईबाबा अस्तित्वात नाही. जड देहाचे बंधन टाकून ते पंचमहाभूतात विलीन झाले. याचा अर्थ ते आपल्यातून निघून गेले असा नाही तर जो त्यांना भक्तियुक्त अंतःकरणाने हरि ॐ बाबा म्हणेल त्या प्रत्येकाच्या अंतःकरणात ते आहेत. ते शिर्डी येथील समाधीमंदिरात आहेत, द्वारकामाईत आहेत. जेथे जेथे त्यांची देवळे आहेत, भक्तिभावाने पुजा केली जाते तेथे ते आहेत. याची प्रचिती अनेकांना येते, आणि देहरूपाने मी गेलो तरीही भक्तांसाठी धावेन. हे त्यांनीच दिलेले वचन सत्य आहे हे पटते. त्यांच्या कृपेने कोणाला नोकरी मिळते तर कोणी भक्त काविळीसारख्या कठीण आजारातून बरे होतात. कोणाचे बरेच दिवस लांबलेले लग्न व्यवस्थित पार पडते. तर कोणाला भयंकर गर्दीतही जागा मिळते व प्रवास सुखाचा होतो. एक ना दोन असे हजारो अनुभव आहेत. साईबाबा भक्तासाठी धावून जातात हेच यावरून स्पष्ट होते.

साईबाबा म्हणजे जणू कृपेचा अथांग सागर! 'साईलीला' मासिकातील हे अनुभव वाचले की, असे वाटते या भक्ताना साईबाबांच्या कृपासिंधूतील एक बिंदू प्राप्त झाला आहे. त्यामुळे ते कृतार्थ झाले आहेत. संकटाची झळ न पोहचता ते संकटातून पार पडले आहेत, किंबहुना साईबाबांनीच त्यांना त्यातून अलगदपणे बाहेर काढले आहे. साईभक्ती कल्याणप्रद व हितकारक अशी आहे.

साखर गोड आहे याचे कितीही वर्णन करून सांगितले तरी तिची गोडी कळत नाही, जर एखादा कण जिभेवर ठेवला तर मात्र गोडीविषयी काही बोलावे लागत नाही. आपल्या जिभेला, मनाला गोडी प्रतीत होते. तसेच साईभक्तांचे अनुभव त्यांच्याच शब्दात वाचले की, असे वाटते. भवसागर तरून जाण्यास साईबाबांच्या कृपेला आपणही पात्र व्हावे.

धन्य धन्य साईनाथा
तुमचे चरणी माझा माथा
भवसागरी मी पतिता
उद्धरि मज देऊनि हाता ॥

हरि ॐ बाबा

श्रीसाईलीला


# ६२ व्या वर्षाचा पहिला अंक
# खास श्री रामनवमी विशेषांक

१ एप्रिल १९८३ रोजी प्रकाशित होईल.

- भक्तांचे रंजक माहितीपूर्ण लेख
- मुखपृष्ठावर श्रीबाबांचे नयनरम्य संग्राह्य चित्र
- किंमत अवघी १ रु. पृष्ठे ६४

आपली प्रत राखून ठेवण्यासाठी आजच वार्षिक वर्गणी अवघी १० रु. भरा.

## नांदा सौख्य भरे !



श्री साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचे चिरंजीव श्री. सुभाषचंद्र यांचा शुभविवाह वसई येथील श्री. श्रीकांत राजाराम गोळवणकर यांची सुकन्या चि. सौ. कां. शुभांगी इजबरोबर शनिवार ता. ११ डिसेंबर १९८२ रोजी माहिम येथील वसरमल खुशालदास सभागृहात मोठ्या थाटाने साजरा झाला. वधूवरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी श्री साईभक्त व विविध उद्योग व्यवसायातील नामवंत मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती.

× × ×

## डॉ. प्रबोध जोशींचे शुभमंगल !

शिर्डीच्या श्रीसाईनाथ रुग्णालयातील डॉ. प्रबोध जोशी यांचा विवाह कोपरगावचे श्री. भालचंद्र कोन्हाळकर यांची कन्या चि. सौ. कां. अलका हिजबरोबर मंगळवार ता. २८-१२-८२ रोजी कोपरगाव येथे व्यापारी धर्मशाळा सभागृहात थाटाने साजरा झाला. वधूवरांना शुभाशिष.

पुण्यतिथीनिमित्त स्मरण

# त्यांनी गुरु असा केला

● श्री गोंदवलेकर महाराजांची पुण्यतिथी मार्गशीर्ष कृष्ण दशमीला असते. त्या निमित्ताने गोंदवले येथे मोठा उत्सव होतो. तेथे त्यांचे भक्त जमतात. अनेक लोकांची तेथे कीर्तने प्रवचने होतात. पण ह्या संत गोंदवलेकर महाराजांनी, त्यांच्यावर जेव्हा त्यांना गुरू करण्याची पाळी आली तेव्हा, किती कष्ट घेतले ही माहिती मोठी उद्बोधक आहे.

त्यांना गुरू शोधून सापडत नव्हता. त्यासाठी ते वणवण हिंडत होते. कारण त्यांना एकच तळमळ लागून राहिली होती, एकच आस लागली होती. त्यांची त्या वेळेला एकच इच्छा होती. गुरु भेटावा, गुरुपदेश घ्यावा. त्यासाठी त्यांना जेवणाखाण्याची शुद्ध उरली नव्हती. त्यांना तहान लागत नव्हती. त्यांना झोपसुध्दा धड येत नव्हती. त्यांना ब्रह्मनिष्ठ गुरु पाहिजे होता. त्यासाठी ते नैमिषारण्यात गेले तेथे त्यांना तो सापडला नाही. तेव्हा ते तेथून मोंगलाईत आले.

त्या वेळेला तुकाईमहाराज म्हणून एक महान् संत मोंगलाईत होते. जेव्हा गोंदवलेकर महाराज मोंगलाईत जाऊ लागले तेव्हा तुकाईमहाराज मनात समजले. गोंदवलेकरमहाराज येत असल्याची वर्दी त्यांना लागली. ते सारखं सारखं म्हणू लागले 'आला रे आला!'

असं म्हणू लागल्यावर लोक त्यांना म्हणजे तुकाईमहाराजांना वेड्यात काढू लागले. कारण ते सामान्य जनांच्या दृष्टीने वेड्यासारखेच वागत होते. वेड्यासारखे करीत होते. ते सारखे म्हणायचे, 'आला रे आला!' पण लोकाना त्या त्यांच्या म्हणण्यापासून काही उमजायचं नाही.

असं म्हणतात की, गुरु शोधावा लागत नाही. माणसाची गुरु करण्याएवढी सिध्दता झाली म्हणजे तो आपोआप अशा माणसाजवळ येतो. पण हे तत्व सामान्य जनांना ठीक आहे. असामान्य जे असतात. त्यांना तो शोधावाच लागतो. कारण त्यासाठीं ते व्याकुळ झालेले असतात.

असे गुरूसाठी भुकेलेले झालेले गोंदवलेकरमहाराज अखेर मोंगलाईत आले. अगदी तुकाईमहाराजांजवळ आले.

आता हे तुकाई महाराज तांब्याच्या बांगड्या आपल्या हातात भरत असत. तसेच पायात पण तांब्याच्या गोलाकार कड्या घालीत असत. त्यांच्याकडे बघितलं की वाटे, हा मनुष्य वेडा आहे. म्हणून सामान्य माणसे त्यांना वेड्यात काढीत.

पण असा ब्रह्मनिष्ठ माणूस खरोखरीच वेडा असतो. कारण त्याला आपला बाप ओळखता येत नाही. आई समोर आली तरी तिला तो ओळखत नाही. ती जाणीवच त्यांना नसते. तो नात्यागोत्याच्या पलीकडे गेलेला असतो. कारण सगळं जग निराळं आणि आपण निराळे अशी त्यांची भावना झालेली असते.

आणि अशा तुकाईमहाराजांजवळ अखेर गोंदवलेकरमहाराज आले. त्यांनी त्यांना पाहिलं. एकमेकांची जणू ओळख पटली. त्यांनी तत्काळ त्यांना दंडवत घातला.

पण तुकाईमहाराजांना गोंदवलेकरांची परीक्षाच करावयाची होती.

तुकाईमहाराजांसमोर गोंदवलेकरमहाराज जाताना त्यांनी त्यांना मातीची ढेकळं मारावयास सुरुवात केली आणि गोंदवलेकरमहाराजांनी ती आनंदाने आपल्या अंगावर घेतली. ढेकळांचा मारा त्यांनी आनंदाने आपल्या अंगावर घेतला. ढेकळांचा मारा यांनी आनंदाने सहन केला. ते त्या तुकाईमहाराजांवर रागावले नाहीत, संतापले नाहीत, तर सहनशीलतेने त्यांनी ती सारी ढेकळं आपल्या अंगावर मारून घेतली.

शेवटी तुकाईमहाराज ढेकळं मारायचे थांबले.

त्यांनी नंतर श्री. गोंदवलेकर महाराजांकडे पाहिलं. त्यांत सहानुभूति होती. दया होती. ओतप्रोत प्रेम त्यात भरलेलं होते.

आणि अखेर ते हंसले.

गोंदवलेकर महाराजांनी दुसऱ्या क्षणीं त्यांच्या पायावर आपलं डोकं नम्रपणानं ठेवलं.

आणि तुकाईमहाराजांनी त्यांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला.

गोंदवलेकर महाराजांनी गुरू केला त्यावेळची अशी ही कथा आहे.

★

शुभ विवाहासाठी लागणाऱ्या पूजेच्या, होमाच्या, ए टू झेड वस्तु
दादरमध्ये मिळण्याचे ठिकाण एकच

# रमेश एम्पोरियम

४५, किर्तीकर मार्केट,
दादर मुंबई ४०००२८.

बाशिंग–मुंडावळींचे मोठे व्यापारी

आता आकर्षक बॉक्स पॅकींगमध्ये
श्री सत्यनारायण महापूजेचे
A to Z साहित्य
सर्व अगरबत्ती विक्रेत्याकडे मिळेल.

AMRUTLAL NAGAR – the famous Hindi writer writes after reading the Hindi translation of our novel on SAI BABA

**' प्रगटे मस्जिदमें साई भगवान ! '** Rs. 45/–

He says, ' Junnarkerji, your book is very interesting. You have sincerely painted the great character of Bhagwan Sri Sai Ram. I Can safely say that your book is **ग्रन्थावतार** of SAI BABA, Please accept my heartiest cogratilations for your success ! ' Many such letters from common and learned people for our original novels.

**' मशिदीत प्रगटला परमेश्वर ! '** Hard Bound Rs. 40/–

**' A MISSION DIVINE ! '** in English Rs. 40/–

Contact : 'PRASHANTI PRAKASHAN',
5, Vasant Apartments, Plot 47, Kastur Park,
Chimpoli Road, Borivali (W.) Bombay 400 092.

## संक्रांतीनिमित्त खास लेख

# तीळ आणि मानव

● योगायोगानेच कुणीतरी येतो. चालता चालताच रस्त्यात एखादे फळ टाकून जातो. या घटनेला काही काळ लोटतो आणि त्या जागेवर एक लहान झाड उगवते, वाढते, फोफावते! योगायोगानेच कुणीतरी त्या रस्त्याने जातो अचानक सळसळत्या पानाकडे पहात असतानाच त्याच्या लक्षात येते की, हे तर पिंपळाचे झाड आहे! आणि मग कुणालातरी कल्पना सुचते! कधी ही कल्पना स्वार्थातून जन्म घेते. तर कधी ती परस्वार्थासाठी आणि मग ती व्यक्ती रस्त्यातला एक दगड उचलते आणि त्या झाडाखाली उभा करते! आणि आपली श्रद्धा त्या काळ्या पाषाणात रुजवू पहाते. कालांतराने अनेकजणांच्या श्रद्धा त्या पत्थरावर जडून जातात. पुढे त्या पत्थरालाच शेंदूर फासण्यात येतो, आणि लोकांची निष्ठा त्याला देवत्व प्राप्त करून देते. श्रद्धा आहे म्हणून हे सारे घडते.

संक्रांतीच्या सणाचेही असेच आहे. अगदी बारीक असलेल्या या गोळीवर साखरेची पुटे चढविली जातात. पुढे त्याच्यावर काटे उभे रहातात. आणि जेव्हा त्याचे अंग पुष्ट होऊन हे काटे उभे रहातात तेव्हाच त्याला ही अवस्था प्राप्त करून देणाऱ्या कोमल हातांचे काम थांबते, आणि मग हा तीळ वापरात येतो. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला तीळ हस्तांतरीत करते आणि ते तीळ देत असताना स्वमनाशी काही श्रद्धा बाळगते. परस्परातील स्नेह वृध्दिंगत व्हावा असेच काहीसे हे असते.

श्रद्धा असते म्हणूनच आपण सर्वजण म्हणतो, 'तीळ घ्या, गूळ घ्या! गोड गोड बोला!' मनात असो वा नसो, चालीरीती आणि अंधश्रद्धा म्हणून का होईना, पण आपणास हे सारे करावे लागते! मानवाचेही असेच आहे. त्यालाही तीळ तीळ झटावे लागते तेव्हा कुठे त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते. लहान तिळावर पाक संस्कार करून त्याचा हलवा बनविण्यात येतो. हे सारे करताना नाजूक बोटांना चटके बसतात. साखरेला विरघळावे लागते. पाण्यात मिसळावे लागते, या रासायनिक क्रियेतून पाक तयार होतो, आणि मग ह्या पाकाला भावना विरहित तिळावर माया चढवावी लागते. यातूनच पुटे चढत जातात आणि महत्व वाढत जाते.

देवाचेही असेच आहे. एका दगडावर पाक (पवित्र) संस्कार करून त्याला देव बनविण्यात येते. हे सारे करीत असताना नाजूक भावनांना आशेचे चटके बस-

तात, शेंदराला विरघळावे लागते. तेल्यात मिसळावे लागते. या क्रियेतूनच पाक (पवित्र) रसायन तयार होते आणि मग या पाकाला भावना विरहित तगडावर माया जडवावी लागते. यातूनच पुढे चढत जातात श्रद्धा वाढत जाते !

मानवाचेही तसेच आहे. मानवी मनावर संस्कार करण्याचे काम, हिऱ्यावर पैलू पाडण्याइतपत श्रेष्ठ आहे. पण पैलू पाडण्यापेक्षाही हे काम अवघड आहे. ज्याप्रमाणे हिऱ्यावर पैलू पाडण्याने मोल येते त्याप्रमाणे मानवालादेखील संस्काररूपी पैलूने महत्व प्राप्त होते.

स्वतःच्या अंगावर पडणाऱ्या आणि आपल्या आजूबाजूचा प्रत्येक प्रसंग यांचा पुरेपूर उपयोग करून स्वतःचे ज्ञान वाढविणे, व्यक्तिमत्व घडविणे हेच जीवनाचे ध्येय धरून चालायला हवे. प्रत्येक क्षण, घटना यांचा सदुपयोग करून आपले ध्येय आत्मसात करण्याची यशस्वी खटपट केली पाहिजे म्हणजे आपणास प्रत्येक क्षणात घटनेत, मनुष्यात नाविन्य आढळून येईल, आपले व्यक्तिमत्व वृद्धिंगत होण्यासाठी आवश्यक असणारे पैलू लाभतील. म्हणून जीवनात येणाऱ्या प्रत्येक क्षणाचे स्वागत आनंदात आणि उत्साहाने करावयास हवे.

सहवासानेच सर्व काही घडून येते. तिळाचेही असेच आहे. नाजूक बोटांच्या स्नेहमय स्पर्शाने तीळ फुलत जातो आणि पाक टिपीत जातो. या पाकाबरोबरच स्नेह ही चिकटून जातो आणि त्यामुळे आपणही त्याचे अनुकरण व मनन करण्यात आनंद मानतो. हा तीळ पाकातील फक्त साखरेचाच अंश टिपून घेतो. पाणी मात्र उडून जाते. मानवातही सहवासानेच सर्व काही घडून येते. आपल्या सोबत्याप्रमाणे आपण किंवा आपल्याप्रमाणे सोबती बनत जातो. तीळ जसा साखरेतील पाकाचाच भाग आत्मसात करतो. तद्वत प्रत्येक मानवाने गुण तेवढे घ्यावे, ते उगाळावे त्याचे चिंतन करावे त्यातच त्याचे कल्याण असते. पाण्याला स्वतःचा रंग नसतो. म्हणून टाकून दिले जाते. ज्या व्यक्तीला क्षणाला घटनेला स्वतःचे व्यक्तिमत्व नसते आणि ज्याच्यात नुसत्याच निर्लेप भावना असतात. अशापासून आपणास घेण्यासारखे काही नसते. त्या व्यक्ती आपल्या जीवनात आल्या तशाच निघून जातात.

तीळ आपल्या जागी असतो. आधाराने काही दिव्य संपादन करावयाचे असते त्यामुळे त्याच्यावर पुटावर पुटे चढविलेली असतात. तो सर्वांपासून मुक्त होऊन पाकात गुरफटून राहून गिरक्या खात जगत असतो/जेव्हा त्यांची भूमिका साध्य होते तेव्हा त्याचे आवर्त थांबते.

जीवन जगताना आपणही तिलाचीच भूमिका स्वीकारली पाहिजे. आपणही आपल्या हिंमतीवर आणि ध्येय ठरले की, त्याच्या पूर्ततेसव सर्व वाईट भावनापासून मुक्त होऊन पवित्र सुखात गुरफटत गिरक्या खात लागत असतो. जेव्हा आपली भूमिका साध्य होते तेव्हा आपले आवर्त थांबते. अस्तित्वात असलेल्या आपल्या सर्वगुणसंपन्न शरीरावर परम सुखाचे, परमार्थाचे व आत्म साक्षात्काराचे फाटे फुललेले असतात आणि आपले सारे अंतःकरण देवाच्या ठायी ओतते आणि मानवतेशी एकरुप होतो.

तेव्हा आपण आज या पवित्र दिवशी सर्वजण हा संकल्प करू या. स्वतः मधुर राहून दुसऱ्यांचे जीवन मधुर बनवू या ! !

★

श्रीसाईलीला

## खास उदी विशेषांक

श्रीबाबांनी आधुनिक जगाला दिलेली संजीवनी उदी ही होय. या उदीचे महत्व विषद करणारा व भक्तांच्या उदीविषयक स्वानुभवांनी गच्च भरलेला हा माहितीपूर्ण अंक १ **मार्च** १९८३ रोजी प्रकाशित होईल. या खास अंकासाठी कुणाही भक्ताने आता या विषयावर लेख पाठवू नयेत. अंकाची संपूर्ण तयारी झालेली आहे.

# नव-वर्षाचे स्वागत

( १९८३ या नूतन वर्षाकरिता 'शुभ-संदेश' )

नूतन-वर्ष हे गरजत आले
नाविन्याच्या झौलात।
'साईलीला' जणु अवतरले
आनंदाच्या ओघात ॥ १ ॥

साईकृपेची ज्योत रहावी तेवत
दुःखावर करण्या मात।
साई माऊली भक्तजनांचे
उजळील जीवन आनंदात ॥ २ ॥

कलीयुगी या जगा तारण्या
अवतरले भूवरि साईराम।
स्वये झिजवुनि देह आपुला
साई दरवळती गगनात ॥ ३ ॥

शिरडी नगरी पावन करूनि
तिथेच वसले साई निजधाम।
भक्त जनांची करुणा ऐकोनि
करिती दुःखावरती मात ॥ ४ ॥

नव वर्षा करू या स्वागत
मोठ्या उत्साहात।
गाऊनि लीला 'श्री साईंची'
'चंद्रकांत' याचना करी, शिरी ठेवण्या हात ॥ ५ ॥

—श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
२९९ गुरूवार पेठ, सातारा-४१५००२

# 'सकल जनाचे साईबाबा'

साईबाबा साई होते
जात पात ते मानित नव्हते
नावगाव ते सांगित नव्हते
साई बाबा साई होते ॥ १ ॥

हिन्दु मुस्लीम शिख इसाई
गिरीजन हो या हरीजनभाई
भेदभाव ते जाणित नव्हते
साईबाबा साई होते ॥ २ ॥

अमीर हो या गरीब कोणी
बाबा तया सम बसती उठती
सर्वांना सम मानित होते
साई बाबा साई होते ॥ ३ ॥

सान थोर या पुरुष बाई
सज्जन दुर्जन गुंड शिपाई
कृपा तयावर करीत होते
साई बाबा साई होते ॥ ४ ॥

बाबा तुमची लीला अगाध
प्रेमाला तर नसे दद।ध
सखल दृष्टी टाकित होते
साई बाबा साई होते
प्रेमळ साई बाबा होते

—श्री. शांताराम ब्रीद
२६ नव योजना सदन
ताडदेव, मुंबई ३४

# साई महिमा

साईनाथा तूच खरा रे आधार
करीशी तू भक्तांचा उद्धार
संकटी उभा राहसी भक्तांपाठी

जसा द्रौपदीला जगजेठी
हाक येता क्षणी सत्वर धावशी

जसा गरूड झेपे आकाशी
तव कृपे दुःख संकटे हरती

जै राम नामे भुते पळती
तूच आम्हा दाविशी मार्ग एकला

जैशी काठी आधार अंधाला
भुकेजल्या पोटी अन्न 'पूर्ण ब्रह्म'

तैसी साई भक्ति 'नादब्रह्म'
तृषार्त जीवा पथ हेच अमृत

भक्ता मात्र साई नामामृत
तव नामाचा उसळे परिमल

अवघे होई सर्व मंगल

—श्री. मुरलीधर घोलप
६५३ सहकार नगर नं. २
चेंबूर मुंबई ७१

# साईपादानंद स्वामी आता अमर ते झाले !

[ ऑल इंडिया साईसमाजाचे अध्यक्ष व विख्यात साईभक्त कै. राधाकृष्णस्वामी उर्फ श्रीसाईपादानंद यांनी सौ. चेंदवणकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन तिथे श्री बाबांच्या मूर्तीची स्थापना केली होती. या प्रसंगाच्या निमित्याने सौ. चेंदवणकर यांनी स्वामीजींना त्यांच्या १४ जानेवारीच्या पुण्यतिथीच्या निमित्याने वाहिलेली ही भावपूर्ण श्रद्धांजली—का. सं. ]

जन्मोजन्मीचे हो पुण्य भाग्य जणु प्रसवले
राधाकृष्ण स्वामीजी ते होते घरी माझ्या आले ॥
साई मूर्ति स्थापनेला त्यांचे हस्त हे लागले
मंत्रविधी करूनिया साईनाथ बैसविले ॥
काय वर्णू हर्ष माझा घर माझे उजळले
जणु साई प्रगटले आशीर्वाद देते झाले ॥
स्वामीजींची पायधूळ घरी येता धन्य झाले
पूर्व जन्मीचे ते पुण्य होते जणु फळा आले ॥
दिसणार नाही आता राधाकृष्ण स्वामी गेले
साईपदी जाऊनीया स्वामी अमर ते झाले ॥
साईपादानंद स्वामी पूज्य वंदनीय झाले
प्रतिष्ठापना विधीला बंगलोरला मी गेले ॥
स्मृति सर्व चाळवता अश्रु नयनी दाटले
सांवराया मला तिथे जणु स्वामी ते धावले ॥
साईपादानंद मूर्ति पाहुनिया लीन झाले
स्मृति सर्व आठवुनी मन माझे व्याकुळले ! ॥

—सौ. तारा चेंदवणकर
१२०/४०५५ राधा माधव
टिळक नगर, चेंबूर, मुंबई ८९

# —: शिर्डी माहिमा :—

साईपुढे-पहाटेस नित्यवाजती चौघडे
सुगंधित पंचामृत साईमूर्ती स्नानघडे ॥१॥

साईपुढे-सनईचे सुमंगल स्वरगाती
भक्तिभावे भक्तजन साईगीते आळविती ॥२॥

साईपुढे-नित्यगाती काकडार्ती प्रातःकाळी
दुपारी नी सायंकाळी शेजारती रात्रवेळी ॥३॥

साईपुढे-अभिषेक पूजा अर्चा हर क्षण
धन्य तुम्ही बाबासाई होती सत्यनारायण ॥४॥

साईपुढे-दैनंदिन नैवेद्य प्रसाद होती
मांगल्याच्या सोहळ्यात भक्तजन भारावती ॥५॥

साईपुढे-गुरूवारी यात्राभरे अतिभव्य
ख्याती तैसी रविवारी भक्त मेळाभरे दिव्य ॥६॥

साईपुढे-कुबेराचे वैभवही फिके पडे
चमत्कार वर्णू किती नित्यनवे दिव्य घडे ॥७॥

साईपुढे-महावस्त्र समर्पण बहु होती
मंदिराच्या वैभवास मौल्यवान भेटी येती ॥८॥

साईपुढे-दर्शनाचा योग भाग्यानेच येई
भक्तौघ तो पाहतांना शिर्डी ग्राम धन्य होई ॥९॥

—श्री. प्र. अ. पुराणिक
देशमुखवाडा कृष्णनगर धुळे १

## ॥ साईबाबा साईबाबा ॥

( चाल : सायोनारा सायोनारा )

साईबाबा साईबाबा
वंदन करतो मी साईबाबा
दर्शन घेऊनी नाथ अनाथ
गर्जती तव नाम साईबाबा ॥ धृ ॥

रुप दिगंबर दत्ताचे
निराकार निर्गुण ब्रह्माचे
मी तू पणाचे बंधन तोडण्या आले अवनी साईबाबा ॥ १ ॥

शिर्डी माझे पंढरपूर
कृपा प्रसादाचा वाहे पूर
भक्तजनांचे प्रेम पाहुनी शिर्डी वसले साईबाबा ॥ २ ॥

अनन्यभावे करू भक्ति
साईचरणी एक-चित्ती
क्षणभंगूर हे जीवन अमुचे कृतार्थ करा साईबाबा ॥ ३ ॥

—श्री. बबन डी. येरम
१/५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर, घाटकोपर मुंबई ८६

## ऑल इंडिया साई समाज, मद्रास

● ऑल इंडिया साई समाजाचे २० वे अधिवेशन यंदा दक्षिणेत नेलोर या शहरी जानेवारीच्या ७, ८ व ९ या तारखांना भरविण्यात येत आहे. देशातील श्रीसाईभक्तांनी अधिवेशनाला अगत्याने उपस्थित रहावे अशी विनंती समाजाचे चिटणीस श्री. टी. केशवराव हे करतात. सर्व साईभक्तांची रहाण्याची भोजनाची, चहापानाची सर्व ती व्यवस्था अधिवेशनाच्या जागी करण्यात आली आहे. प्रतिनिधी फी अवघी २५ रु. ठेवण्यात आली आहे.

## पुजितो साईची मूर्ती

हृदयी तुझी स्मृती । करितो मी तुलाच आरती ॥
पुजितो साईची मूर्ती । पुजितो साईची मूर्ती ॥
जीवनी मजला स्थान दिले । तू साईनाथा सन्मानाचे ॥
माता पिता त्या पूर्वजनानी । जगले जीवन मानाचे ॥
लावीलेस मला भजनी । भक्त सारे संपर्क करती ॥
जातीवादाच्या मर्म भेदाला । दिली जगी मूठ माती ॥
हिंदू, मुस्लीम, शीख, इसाई । बसती एका पंगती ॥
साईनाथाने केली कृती । आनंदे नटली शिर्डी धरती ॥

--श्री. सूर्यकांत रघुनाथ दळवी
६५/१९३० पंतनगर घाटकोपर मुंबई ७५

## ' शिरडीवाले साईबाबा '

' शिरडीचे श्री साईबाबा ' या श्रीसाईबाबांच्या जीवनावरील एकमेव नाटकाच्या अपूर्व यशानंतर बाबांच्या प्रेरणेनेच कुमारसेन गुप्ते या नाटकाचे हिंदी भाषिकांसाठी ' शिरडीवाले साईबाबा ' या नावाने प्रयोग करणार आहेत. डिसेंबर अखेरीस हिंदीकरण रंगभूमीवर येत आहे. हिंदी भाषेतील प्रसिद्ध लेखक पंडीत मधुसूदन जोशी या नाटकाचे लेखक आहेत.

## हरि ॐ साईराम

करता स्मरण श्री साईंचे ।
दैन्यहि दूर होई त्याचे ॥

धरा दृढ श्रद्धा मनी ।
श्रीसाई धावत येई सत्वरी ॥

श्रीसाईंचे स्मरण होता ।
दिसेल रामकृष्ण शिवशंभो नाथा ॥

श्रद्धा सबुरी असेल निष्ठा ।
करिल स्वेच्छा पूर्ण अभिष्ठा ॥

समर्पण चारी विकृती ( राग, लोभ, मद, मत्सर )
जगजेठीच्या पाई
दिसेल श्रीसाई ठायी ठायी ॥

—श्री. राम धनावडे
सुखशांती को. ऑ. हौ. सोसायटी
कन्नमवार नगर, विक्रोळी (पू.)
मुंबई–८३

## शामसुंदर भेडा यांचे निधन

श्री. शामसुंदर भेडा हे साईभक्त होते. शिर्डीस ते प्रत्येक उत्सवास श्रींचे दर्शनास येत व गायनाची हजेरी श्रीं च्या पुढे देत असत. ते नामवंत गायक होते. अभंगवाणी, पदे, गीते भावनेने आणि खणखणीत पहाडी आवाजात श्रोत्याना ऐकवीत असत. त्यांनी १० वर्षे गायनरुपी साईसेवा केली.

श्रीबाबा मृताच्या आत्म्यास शांती देवोत.

# साईधाम मुक्तीधाम

रामरूप श्यामल ते पहायाचे ना ?
चला चला शिरडीला साई दर्शना ॥

नलगे ती मुळी काही देव-दक्षिणा
चुकवाया चला चला जन्म मरणा ॥

अमृताची गंगा येथे पुण्यपावना
चला चला जाऊ सारे पापनाशना ॥

घालवाया आधी-व्याधी भूत भावना
शोधायाते दुर्दैवाच्या कार्य कारणा ॥

काही नको द्याया तेथे मना सज्जना
साईधाम सुखधाम हीच धारणा ॥

पूर्ण करायास साऱ्या मनः कामना
चला चला शिरडीला साईदर्शना ॥

—श्री. विनायक पाठक
बी, १७/२३४, राजावाडी
घाटकोपर, मुंबई ७७

☆

## १ ) चमत्कार

तेल्यानी तुम्हा तेल नाही दिले हो
क्षणार्धात, बाबा, निघाला कुठे हो ?
चमत्कार तात्काळ दावूनी तेथे,
कुपातील पाण्यावरी ज्योत पेटे !

## २ ) भक्तांची चिंता

धीलाडगीच्या मांडीवरचे,
मूल भट्टीत कोसळले
धांवा धांवा साईबाबा,
आईचे हृदय कळवळले
मैलोगणिक दूर बाबा,
तरीही त्यांना हे कळले
कृपा करावी भक्तावरती
म्हणून तेथून ते उठले
बाबांनी तत्काळ घातला हात आपुला धुनीत
आणि रक्षिले त्या बाळाला बैसुनी शिरडीत
मातापिताच्या डोळ्यामधूनी कृतज्ञतेचे अश्रू टपटपले
दर्शन घ्याया बाबांचे दूर शिरडीस ते निघाले.

—श्री. विठ्ठल याळगी
११७०, कडोलकर गल्ली, बेळगांव

# अब तेरे सिवा कौन ?

अब तेरे सिवा कौन मेरा साईबाबा रे
बिगडी मेरी बना दे ओ....शिरडी के राजा रे

माता पिता बंधू सखा सब कुछ मेरे
चरणो में जगा दे दो प्यारे बाबा मेरे
तुझे छोड के कहाँ जाऊं वो तो तूही बता दे
बिगडी मेरी बना दे ओ...शिरडी के राजा रे ॥ अब ॥

मंझदार में पडी है नैय्या ओ! मेरे बाबा
तुम पार लगादो, ओ मेरे नाव खेवैया
भक्ति के किनारे पे मेरी नाव लगा दे
बिगडी मेरी बना दे ओ शिरडी के राजा रे! अब ॥

जैसा भी हूं खोटा या खरा मैं बाबा तेरा
भुला भटका आया हुं एक आसरा तेरा
चंदु को आज शरण में ले लो मेरे बाबा
बिगडी मेरी बना दे ओ! शिरडी के राजा रे! अब ॥

—सौ. चन्द्राबेन भाटे
द्वारा डॉ. व्ही. के भाटे,
१७/३ जयंत व्हिला, किडवाई मार्ग,
वडाळा, मुं. ३१

# साई माझी गुरुदेवता

साई माता साई पिता
साई माझी गुरु देवता ॥ ध्रु० ॥

चला शिरडी गावी जाऊ
साई नाथ डोळा पाहू ॥ १ ॥

चरणी वाहे गोदा गंगा
लीन होऊनी ठेवू माथा ॥ २ ॥

मुखे बोळा साई साई
सर्व पाप विलया जाई ॥ ३ ॥

साई संत महा थोर
तुमचा वाहतील सर्व भार ॥ ४ ॥

जन्म नाही रे आणिक
करा बाबांचे पूजन ॥ ५ ॥

—सौ. शिला शंकर चवंडे
१४४६, चवंडे वाडी, रत्नागिरी
पिन १४५६१२

# विसावा साईनाथा

विसावा साईनाथ सुखाची साऊली
प्रेमे पान्हा घाली भक्तावरी ॥ ध्रु० ॥

दाखवी चरण, दाखवी चरण
दाखवी चरण साई तुझे ॥ १ ॥

साई आचार साई विचार
करावा साई जिवेभावे ॥ २ ॥

साई सगुण, साई निर्गुण
वेगे घाली उडी सावकाश ॥ ३ ॥

साई माता साई पिता
वाचविरे ह्या युगातुनी ॥ ४ ॥

—श्री. भालचन्द्र ल. पोटकुळे
मुंब्रा, ठाणे



वांद्र्याचे कला महर्षि श्री. जाधव मास्तर यांनी आपल्या निवास स्थानी तयार केलेल्या प्रति द्वारकामाईतील श्रीबाबांच्या मूर्तींची पूजा करताना शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे.

# शिरडी –वृत्त माहे ऑक्टो. १९८२

या महिन्यात श्री साईबाबांची पुण्यतिथी उत्सव असल्यामुळे श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी बरीच होती. सालाबाद प्रमाणे उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला.

**दसरा उत्सव पहिला दिवस**—मंगळवार दि. २६–१०–८२ रोजी पहाटे ५ वाजता मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. आरती संपल्या नंतर श्रींच्या फोटोंची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारका माईत गेली. त्या ठिकाणी साईसचरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधी मंदिरातील नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. भास्करबुवा रामचंद्र धैसास पुणे यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धुपारती झाल्यावर ७–२० ते ९ व ९–३० ते १०–३० पर्यंत श्री. अरविंद पिळगांवकर, मुंबई यांचे सुश्राव्य गायन झाले रात्रौ ९–१५ ते ११–३० श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**दसरा उत्सवाचा मुख्य दिवस**—बुधवार दि. २७–१०–८२ रोजी पहाटे ५ वाजता मंदिर उघडल्यानंतर ५–१५ वा. काकड आरती झाली. नंतर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची ग्रंथ वाचून समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधी मंदिरात आली. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी ९ ते ११ पर्यंत भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. कोर्ट रिसिव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी स्वतः झोळी घेऊन उपस्थित साईभक्तांना झोळ्या दिल्या. मंदिरात समाधी मूर्तीचे दर्शन झाल्यावर झोळी मिरवणूक द्वारकामाईतून गावात गेली. शिर्डी गावात घरोघरी भिक्षे–साठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षा झोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १०–३० ते १२ पर्यंत श्रींचे पुण्यतिथी कीर्तन ह. भ. प. भास्करबुवा धैसास यांनी केले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तिर्थप्रसाद वाटण्यात आला. दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत श्रींची आराधना विधी कार्यक्रम श्री. क. हि. काकरे कोर्ट रिसिव्हर यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी पुरोहितांना धोतर, उपरणे, सुवासिनींना खण व सेवेकऱ्यांना धोतर कापड दिले.

सायंकाळी ५ वा. सिमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत लेंडीबागेचे देवळाजवळ आली. श्रींच्या निशाणाची पूजा व शमीचे पूजन झाल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम

झाला, धार्मिक पुजाविधी कार्यक्रम कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी केला. खंडोबा देवाचे दर्शन घेतल्यावर गावातील सर्व देवळात जाऊन उपस्थित लोकांनी देवतांचे दर्शन घेतले. त्यानंतर मिरवणूक मंदिरात आली व धुपारती झाली.

रात्रौ ७–३० ते ८–३० पर्यंत मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बँडपथक परेल, भोईवाडा यांच्या बॅण्डवादनाचा कार्यक्रम झाला. ९–१५ वा. श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली. सनई, चौघडा, शिंगवादन, डफ, बॅण्डपथक, टाळ मृदं–गाच्या गजरात मिरवणूक गुरुस्थानजवळ आली. तेथे भारुड गारुड कार्यक्रम झाले. पुण्याचे भक्त, नकलाकार रघुनाथ सांडभोर, शिर्डीचे ग्रामस्थ श्री. तुकाराम परदेशी यांनी करमणुकीचे कार्यक्रम केले. त्यानंतर मिरवणूक १२ वा. मंदिरात आली, व सर्वांनी कलाकारांचे हजेरीत भाग घेतला. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव ३ रा दिवस**—गुरुवार दि. २८–१०–८२ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान या ठिकाणी सकाळी ७–३० ते ८–३० रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त रात्रौ ७–३० ते ९ ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिर्डी यांचे प्रवचन झाले. रात्रौ ९–१५ ते १० गुरुवारची पालखी कार्यक्रम होऊन शेजारती झाली.

**दसरा उत्सवाचा ४ था दिवस**—शुक्रवार दि. २९–१०–८२ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १०–३० ते १२ वाजेपर्यंत ह. भ. प भास्करबुवा घैसास, पुणे यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झालेवर माध्यान्ह आरती झाली व भक्तांना तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्रौ ७–३० ते १० वाजेपर्यंत प्रा. श्री. लक्ष्मणराव देशपांडे औरंगाबाद यांचा 'वऱ्हाड निघालंय लंडनला' हा एकपात्री प्रयोग उत्कृष्ट झाला व शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला

**कोजागिरी पौर्णिमा**—रविवार दि. ३०–१०–८२ रोजी सायंकाळी धुपारती झाल्यानंतर डॉ. के. बी. गव्हाणकर व मंडळी मुंबई यांचे गायनाचे कार्यक्रम सुरू झाले रात्री ८ ते १० गायनाचा कार्यक्रम झाल्यावर १० ते १२ पर्यंत सौ. पद्मजा र. सहस्रबुध्दे यांचे कीर्तन झाले. १० ते १२ वाजेपर्यंत कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी श्रींच्या समाधीची पूजा व चंद्रपूजा केल्यावर उपस्थीत भक्तमंडळींना दूध, पोहे प्रसाद वाटणेत आला. १२ ते सकाळी ५ वाजेपर्यंत डॉ. गव्हाणकर व मंडळी यांनी करमणुकीचे ( लोकनाट्य ) कार्यक्रम केले.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे-

**कीर्तन** — १) ह. भ. प. श्री. कृष्णा विष्णू शिखरे, अंधेरी.
२) ह. भ. प. श्री. भास्करबुवा रामचंद्र कैलास, पुणे.
३) ह. भ. प. सौ. सहस्त्रबुद्धे, मुंबई.

**प्रवचन** — १) ह. भ. प. श्री. पंडीत गजानन पुराणिक, पुणे.
२) ह. भ. प. श्री. कुलकर्णी महाराज, पंढरपूर.
३) ह. भ. प. श्री. मुरलीधर नारायण देशमुख, शिर्डी.
४) ह. भ. प. श्री. लक्ष्मणबुवा बावचौरे शिर्डी.

**भजन, गायन, वादन, नृत्य, वगैरे** — १) श्री. संतोष विजय, दिल्ली. २) श्री. विष्णूपंत यशवंत शिखरे, अंधेरी. ३) श्री. एम. एस. गोपालस्वामी, सिकंदराबाद ४) श्री. सुरेंद्र सक्सेना, दिल्ली. ५) सौ. नटेश्वरी हैद्राबाद. ६) श्री. प्रियनाल गुप्ता हैद्राबाद. ७) सौ. मालतीबाई कुलकर्णी, पुणे. ८) श्री. बापूराव माने नटवर्य, पुणे. ९) श्री. सुरदास खरे, पुणे. १०) श्री. शेखर सरोदे, पुणे. ११) श्री. सतिश जोगळेकर पुणे. १२) कु. विमल भाऊसाहेब शिर्के, जळगाव. १३) श्री सु. एस. तेलंग १४) कु. कल्पना तेलंग, इंदोर. १५) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, परेल. १६) श्री. अरविंद पिळगांवकर, मुंबई. १७) श्री. भोजराज साळवी. मुंबई. १८) श्री. मकरंद कुंडले मुंबई. १९) श्री. दत्ता लिमये. २०) श्री. त्र्यंबक पिळगांवकर २१) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती. २२) श्री. भोलानाथ समेळ, गिरगाव २३) श्री. सी. व्ही. प्रसाद, हैद्राबाद. २४) श्री. नामदेवराव भोईर, नवघर. २५) श्री. गोपाळ सुर्वे आणि मंडळी मुंबई. २६) श्री. दत्तराज खोत २७) श्री देवदत्त साबळे. २८) श्री चंद्रकांत सुर्वे, २९) मधुवंती सुर्वे, ३०) सुर्यकांत सुर्वे ३१) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. ३२) श्री. राजेश सुर्वे, ३३) श्री. नारायण क्षीरसागर, चिकलठाणा. ३४) श्री. मिराराव, भोपाळ. ३५) श्री. छबुराव अहिरे, हनुमंतगाव. ३६) श्री. नंदकिशोर पुरोहीत बडोदा. ३७) श्री. श्रीकृष्ण मुरखोडे ३८) सौ. निर्मला बलराज नायडू, शिर्डी. ३९) श्री. विष्णू मांजरेकर, शिर्डी. ४०) सौ. प्रभा देवीदास मिरघे लक्ष्मीवाडी. ४१) सौ. कमल रघुनाथ सांडभोर पुणे. ४२) कु. मनीषा विश्वनाथ केळकर, नाशिक. ४३) श्री. विष्णू दयाळ, कानपूर. ४४) श्री. सुहास भालचंद्र कुलकर्णी, मुलूंड. ४५) श्री. गिरीश वासुदेव तांडेल, नवघर ४६) सौ. गिजरे शिरडी. ४७) सोपान गोरक्षनाथ-वाळूंजकर, कापूरवाडी. ४८) श्री. माधव औसरकर, संगमनेर. ४९) श्री. अशोक शर्मा बंगाल. ५०) श्री. दिगंबर भातोडे, राहता. ५१) श्री. शशीकांत जोशी

राहाता. ५२) श्री. प्रमोद बाबूराव बहाडणे. ५३) डॉ. शैख नजीर राहता ५४) श्री. अहमदखाँ गुलाबखाँ पठाण, राहता. ५५) श्री. शांताराम मिस्त्री मुंबई ५६) श्री. ज्ञानोबा वाडेकर, शिरडी. ५७) श्री. हरकचंद चंद्रभान नणवाण आलेगाव. ५८) श्री. विजय भगत सावंतवाडी ५९) लीलाबाई गुजराथी शिर्डी. ६०) श्री. परशराम गोविंद आंगणे मुंबई. ६१) श्री. ललीत कुमार जोशी, शिर्डी ६२) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. ६३) मणीबेन हैद्राबाद. ६४) अन्नपुर्णा, शिर्डी. ६५) श्री. दयाळ बाबू सक्सेना ६६) श्री. अर्जुन सुकदेव चव्हाण ६७) श्री. नानासाहेब रासने ६८) श्री. संतसेवा भजन मंडळ पुणे. ६९) श्री. बळीराम राजाराम ढूकरे. ७०) श्री. राजाराम सताजो राऊळ, मुंबई. ७१) श्री. गंगाधर जाधव, पुणे. ७२) श्री. सखाराम राघोजी सालकर. ७३) सौ. आशालता प्रकाश फाटक, मुंबई. ७४) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिरडी. ७५) श्री. विलास राजाराम महाडिक मुंबई ७६) श्री. मारुती गुणाजी मांडवकर. ७७) श्री. शशीकांत ए. दळवी, ७८) श्री. अभय जगन्नाथ मोरे, ७९) श्री. राजन मधुकर सातवरे. ८०) श्री. सतीश नागेश राव ८१) श्री. सुरेश राजाराम आंजर्लेकर, ८२) श्री. सुभाष कांबळी, ८३) श्री. बारवकर ब्रदर्स शिरडी. ८४) श्री. रघुनाथ नागरे. ८५) श्री. चतुर्धन नागरे. ८६) श्री. शाम मिरवणे ८७) श्री. प्रदिप रासने. अहमदनगर. ८८) श्री. विलास परळकर, मुंबई. ८९) श्रीकृष्ण बंन्द्रपथक सेवा-मंडळ परळ. ९०) श्री. अम्मापुरकर, पुणे. ९१) श्री. माणिक साळी, शिरडी. ९२) श्री. विवेक यादवराव मुळे, मुंबई. ९३) श्री. महेश हिराकांत सावर्डेकर. ९४) सौ. शरयू साईदास मराठे. ९५) श्री. रमेश द. वैद्य गोरेगाव. ९६) प्रा. लक्ष्मणराव देशपांडे औरंगाबाद. ९७) डॉ. के. बी. गव्हाणकर कोजागिरी उत्सव मंडळ कुर्ला. ९८) श्री. चंद्रकांत दामोदर सामंत. ९९) श्री. जयवंत पाताडे १००) श्री. भालचंद्र रिसवाडकर.

**हवापाणी** -- शिरडी येथील हवापाणी उत्तम रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो.

# शिरडी वृत्त माहे–नोव्हेंबर १९८२

या महिन्यात श्रीसाईबाबांचे समाधी दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. ती खालील प्रमाणे —

**कीर्तन** – १) ह. भ. प. श्रीमती कृष्णाबाई येवलेकर, सातारा
**प्रवचन** – १) ह. भ. प. रघुनाथ कृ. कारखानीस, पुणे २) श्री. देशमुख महाराज शिर्डी. ३) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी.

**भजन, गायन, वादन वगैरे** — १) श्री. हरीओम शरण, मुंबई. २) नंदिनी शरण, मुंबई. ३) श्री. जी. तु. शर्मा मुंबई. ४) श्री. तपन भट. ५) श्री. बुद्र रोमैया, विशाखा पट्टणम ६) श्री. अण्णासाहेब कागे गौतमनगर. ७) श्रीमती लीलावती कोटकर कल्याण. ८) श्रीमती गोदावरी रामकृष्ण गांवकर, पुणे. ९) सौ. चंद्राबेन व्ही. भाटे वडाळा. १०) श्री. के. टी. टिकू काश्मिरी, मुंबई. ११) श्री. के. टी. संजीव राव, हैद्राबाद. १२) कु. वंदना मो. शिरोडकर, मुंबई. १३) श्री. मोहन वि. शिरोडकर. १४) विश्वनाथ मोहन शिरोडकर. १५) श्री. काशीनाथ ल. काडणेकर. १६) श्री. वसंत का. काडणेकर. १७) श्री. गोपीनाथ ना. वाळके, विक्रोळी. १८) सौ. हेमलत श्रीहरी खोबरागडे, नागपूर. १९) मालिनी कपिलेश्वरी मुंबई. २०) सुजाता कपिलेश्वरी २१) श्री. उल्हास यशवंत नाचणकर. २२) श्री. अशोक मि. जाधव. २३) पिटर ब. कोळी. २४) सायमन फ्रा. मारूचे. २५) श्री. मोहन ना. वानमाळी. २६) मेमन महमद रफी २७) सैयद महमद अर्मान २८) सुषमा सामंत २९) मीना न. सामंत ३०) अभिनव विद्यालय, वसईरोड. ३१) श्री. भगवती साई संस्थान कुर्ला, श्री नारायण स्वामी ३२) श्री. पांडूरंग वामन भोसले. ३३) श्री. शांताराम बुवा पावळकर, मुंबई. ३४) सौ. निर्मला पावळकर ३५) श्री. फिरंगाई तालीम दत्त भजनी मंडळ, कोल्हापूर ३६) श्री. वसंत दत्तात्रय फुलंबरीकर, बांद्रा ३७) सौ. आसावरी बांबकूळ, घाटकोपर. ३८) श्री. शिवाजी तु. धुमाळ, शिर्डी

**कार्तिकी महाएकादशी** — (शनिवार दि. २७-११-८२) कार्तीकी महा-एकादशी निमीत्त समाधी मंदिरात कीर्तन, रात्री श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक ११–३० ला आल्यानंतर शेजारती झाली.

**तुलसी विवाह**— सालाबाद प्रमाणे तुळसी विवाह कार्यक्रम थाटात साजर

झाला. कार्यक्रमास साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थीत होते. सर्वांना प्रसाद वाटण्यात आला.

**हवापाणी**— शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## एक टाक्याचे स्त्री–कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया शिबीर

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी, तालुका पंचायत समिती कोपरगांव व प्राथमीक आरोग्य केंद्र राहाता यांचे संयुक्त सहकार्याने दि. २९–११–८२ रोजी श्रीसाईनाथ हॉस्पीटलमध्ये एक टाक्याचे स्त्री–कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया शिबीर पार पाडण्यात आले.

शिबीरात एकुण ५२ शस्त्रक्रीया करण्यात आल्या. रूग्णांची जेवणाची व चहाची सोय श्रीसाईबाबा संस्थान मार्फत मोफत करण्यात आली होती. तसेच संस्थान तर्फे रूग्णांना १ स्टीलचे ताट, २ स्टीलच्या वाट्या व १ नग ब्लॅन्केट देण्यात आले, तालुका पंचायत कोपरगाव यांचे वतीने रूग्णांना प्रत्येक रु. १००–०० व प्रवर्तकास प्रत्येकी रु. १०–०० मात्र देण्यात आले.

शिबीरात संस्थान रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. एस. देशपांडे, डॉ. एम. वाय. देशमुख, प्राथमिक आरोग्य केंद्र राहाताचे डॉ. गुंजाळ डॉ. एस. के. पाटील, डॉ. दोघीवाला, पुणतांब्याचे डॉ. स्वामी, वासनळीचे डॉ. क्षीरसागर आदिंनी शस्त्रक्रीया केल्या व त्या कामी डॉ. वरडे, डॉ. गुलवानी, डॉ. इंगे व डॉ. नामधारी यांनी बहुमोल सहाय्य केले.

शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्याचे कामी, बी. डी. ओ. श्री. शिन्दे, कोपरगाव तालुका पंचायतीचे सभापती श्री. काळवाघे, संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. ही. काकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिबीराचा समारोप समारंभ मा. कोर्ट रिसीव्हर यांचे हस्ते श्रीसाईनाथ रूग्णालयात पार पडला.

# साईनिकेतन मधील विजयादशमीउत्सव

सालाबाद प्रमाणे यंदादेखील विजयादशमी उत्सव २७ आक्टोबर १९८२ रोजी श्रीसाईबाबा शिरडी संस्थानच्या मुंबई येथील ऑफीसमध्ये साईनिकेतन दादर टी. टी. येथे मोठ्या धुमधडाक्याने साजरा झाला. सकाळी ८ वाजल्या पासून रात्री ८ वाजे पर्यंत 'श्री'च्या दर्शनासाठी ऑफीस उघडें होते. त्याचा असंख्य साईभक्तानी लाभ घेतला. बरोबर दुपारी १२ वाजता बाबांची आरती झाली. त्यानंतर मुंबईतील बोरीवलीचे साईभक्त श्री. विजय हजारे यांनी संपादित प्रकाशित केलेल्या श्री साई साहित्याला वाहिलेल्या एकमेव दिवाळी अंकाचे 'साईप्रसाद' दिवाळी १९८२ चे प्रकाशन श्रीसाईलीला (इंग्रजी)चे संपादक डॉ. परचुरेंच्या हस्ते झाले.

आपल्या भाषणात त्यांनी आपण श्री हजारेंना गेली दहाबारा वर्ष पहात असून ते म्हणतात त्याप्रमाणे ते खरोखरच ते साईसेवक आहेत व साहित्याद्वारे साईसेवा अगदी निस्वार्थीपणे, तनमनधन वेचून करीत आहेत, व त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मागील वर्षीचा त्यांचा 'साईकृपा' तर यंदाचा हा 'साईप्रसाद' दिवाळी अंक हे होय' असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे या नात्याने बोलतांना 'भक्ती संगम'चे संपादक श्री सुधाकर सावंत यांनी अंक काढतांना काय त्रास पडतो ते सांगून हलीच्या काळात भक्तीमार्गाचे महत्व काय ते विशद केले.

अर्धा तासभर हा कार्यक्रम झाला. सर्वांना शेवटी पेढे वाटले गेले.

साईनिकेतन मधे दिवसभर भक्तांनी श्रीबाबांच्या दर्शनास गर्दी केली होती.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| ९०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| ११) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| १२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| १३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाइड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=०० (व्ही. पी. ची पद्धत नाही)

| अ.क्र | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशीर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०५ | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. द्वि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादासाहेब फाळके मार्ग जवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४